## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५८
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

१. श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक,
भूमी अभिलेख,बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
भूमी अभिलेख, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १६.०२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे १६ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी या अपील अर्जावर दि.०५.०५.२००८ रोजी निर्णय दिला. या निकालामध्ये अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १५.०३.२००८ पासून पुढे माहिती देईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे त्यांच्या जमीन मोजणीच्या संदर्भात त्यांनी दि.२३.०१.२००४ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात एकूण १६ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाने अपेक्षिली होती. अपिलार्थीने अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे जी माहिती मागितली होती ती माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असल्यामुळे अधीक्षक, भूमी अभिलेख बीड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याकडील दि.१८.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे पाठविली. तथापि तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून अपिलार्थीस कोणत्याही स्वरुपाचा प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपसंचालक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांच्याकडे दि ०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय प्राधिकरण म्हणून जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,बीड यांची नेमणूक केली गेली असल्यामुळे उपसंचालक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडील दि.१७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या स्तरावर निकाली काढला व अपिलार्थीस जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,बीड यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने नंतर त्यांचे प्रथम अपील जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे कधी पाठविले, यासंदर्भातील कागदपत्रे आयोगाकडे उपलब्ध नाहीत. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०५.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी व उपसंचालक, भूमी अभिलेख हे उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती न्यायप्रविष्ट स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीने अर्ज केला त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. बेग नावाचे प्रमुख लिपीक यांची नेमणूक झाली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत केली त्यावेळी त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या ज्या जमिनीच्या मोजणीच्या संदर्भात माहिती मागविली आहे. त्या जमिनीची मोजणी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,बीड यांच्या कार्यालयातर्फे अपूर्ण स्वरुपात झाली असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मोजणीचा उर्वरित भाग त्यांना पूर्ण करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि.१६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे १६ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने,"आपण वरिष्ठ अधिकारी,औरंगाबाद,उपसंचालक,भूमी अभिलेख कार्यालयाला माहिती दिली नाही. "या विषयी कायदेशीर रित्या माहिती द्यावी", "मला आदेश काढून सत्य सापडले नाही, याच्या कारणांची माहिती द्यावी", "या विषयी उत्तर कायदेशीर आहे काय", "कोर्टामार्फत ताबा हे मालकी हक्क सिध्द होऊ शकत नाही काय", "माझ्याकडील ताबा ठेवला म्हणजेच माझी मालकी होऊ शकत नाही काय", अशा स्वरुपाची माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती देण्याविषयी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अथवा त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अथवा त्यांची मते अशाप्रकारची माहिती मागणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हीच अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होऊ शकत नाही.

असे असले तरीही अपिलार्थीच्या दि.१६.०२.२००८ रोजीच्या अर्जास, जो जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,बीड यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,बीड यांच्याकडे दि.१८.०२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला, त्या अर्जास तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख,बीड यांनी कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विनाकार्यवाही त्यांच्याकडे ठेवून दिला, ही बाब आयोगास नजरेआड करता येणार नाही. अपिलार्थीस जर संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे शक्य नव्हते तर त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे भाग होते. तथापि त्यांनी या प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.०५.०५.२००८ रोजीच्या अपील निर्णयाचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले नसावे, असे आयोगास वाटते. त्यांनी दि.०५.०५.२००८ रोजीच्या त्यांच्या निर्णयाद्वारे दिलेले आदेश हे पूर्णतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख श्री. वाघमोडे यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या जमीन मोजणी प्रकरणात तक्रार अर्ज केला आहे, त्या तक्रार अर्जावर संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी जमाबंदी आयुक्त तथा संचालक,भूमी

अभिलेख यांनी त्यांच्या स्तरावर लक्ष घालून या प्रकरणाचा लवकरात लवकर निपटारा करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या या प्रकरणाशी संबंधित संचिकेची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत वेगळयाने विनंती अर्ज करुन त्यांना अपेक्षित असलेल्या जमीन मोजणीच्या संदर्भातील अभिलेख्याची तपासणी केल्यास त्यांच्या शंकांचे निरसन होऊ शकेल, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कचरुलाल बस्तीमल जैन,शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त तथा संचालक,भूमी अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. श्री. वाघमोडे तत्कालीन तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड) (नोंदणीकृत टपालाव्दारे)

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४५९
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
रा.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद,
अहमदपूर,जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०३.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती देण्याचा आदेश दिला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी श्री. गुळवे यांच्या नेमणूकीच्या वेळी दि. २४.०२.१९७७ साली सेवापुस्तिकेत जोडलेल्या मूळ टी.सी.ची सत्यप्रत दिली नाही. मूळ टी.सी.ची प्रत द्यावी म्हणून त्यांनी परत स्मरणपत्र दिले असता त्यांनी टोलवाटोलवीचे उत्तर देऊन अपिलार्थीची फसवणूक केली व माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली केलेली आहे. त्यामुळे मुख्याधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. गुळवे बी.एन. वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, अहमदपूर यांनी नेमणूकीच्या वेळी सेवापुस्तिकेस जोडलेल्या मूळ टी.सी.ची सत्यप्रत आयोगाने मिळवून द्यावी

आणि या प्रकरणी अपिलार्थीस झालेल्या खर्चाची नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी विनंती अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये अखेरीस केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. गुळवे बी.एन. (मुख्य लिपीक,नगर परिषद,अहमदपूर) यांच्या मूळ टी.सी., सनद, नेमणूक आदेश,पगारपत्रक, सेवापुस्तिकेच्या सत्यप्रती तसेच त्यांच्या आणि कुटुंबातील व्यक्तींच्या नावे असलेले प्लॉटींग,इमारत इत्यादी सर्व मालमत्तेबाबतची मूल्यांकनासह तपशीलवार माहिती नगर परिषदेमध्ये असलेल्या नोंदीनुसार मिळण्याकरिता विनंती केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्रयस्थ पक्षाच्या सेवाविषयक अभिलेख्यांशी संबंधित माहिती देता येत नसल्याचे कळविले व नगरपरिषदेच्या मालमत्ता रजिस्टरवर श्री. बा.ना.गुळवे यांच्या नावे असलेल्या मालमत्तेचा तपशील अपिलार्थीस कळविला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०२.२००८ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०३.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणीच्या संदर्भात कलम ११ मधील कार्यपध्दतीचा अवलंब करुन निर्णय घेण्यात यावा, असे आदेश दिले. थोडक्यात, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेण्याचे काम परत जन माहिती अधिकारी यांच्यावर सोपविले. तथापि यानंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात माहिती मागविली आहे तो त्रयस्थ पक्ष म्हणजे ते स्वतःच असून त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्रथम दि. २८.०४.२००८ रोजी व तदनंतर दि. २८.०५.२००८ रोजी दिली असून यासंदर्भात अपिलार्थीची माहिती प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली व अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती आयोगास दाखविल्या.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०४.२००८ व दि.२८.०५.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेलेली संपूर्ण माहिती ही श्री. गुळवे यांच्या कॉलेजच्या टी.सी.ची नक्कल आहे. श्री. गुळवे यांनी ज्या वेळी पदवी अभ्यासक्रमाकरिता कॉलेजमध्ये प्रवेश केला, त्यावेळी त्यांच्या एस.एस.सी.ची टी.सी. संबंधित महाविद्यालयाकडे सादर केली होती. त्यामुळे ती मूळ टी.सी.ची प्रत संबंधित महाविद्यालयात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध असणार नाही. परिणामी ही माहिती (एस.एस.सी.ची टी.सी.) अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसल्याने देय होणार नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये श्री. गुळवे यांच्या मूळ टी.सी.ची मागणी केली आहे. तथापि मूळ टी.सी.म्हणजे एस.एस.सी.ची टी.सी.असे गृहित धरले तर, ही माहिती, वरील कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय असणार नाही. कॉलेजच्या टी.सी.ची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. श्री. गुळवे हे अहमदपूर नगर परिषदेच्या

सेवेत प्रवेश करतेवेळी ते पदवीधारक नव्हते, तर त्यांनी पदवी अभ्यासक्रमासाठी कॉलेजमध्ये त्यावेळी प्रवेश घेतला असेल व त्यामुळे त्यांनी अहमदपूर नगरपरिषदेमध्ये सेवा सुरु असताना त्यांच्याकडे एस.एस.सी.च्या टी.सी.ची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसणार, हे उघड आहे. अपिलार्थीने मागणी केलेली व जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य दिलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा आता नेमणूकीनंतरची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे किंवा कसे व ही माहिती उघड झाल्याने अपिलार्थी कोणते व्यापक जनहीत साध्य करणार आहेत हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे,द्वारा इंडिया झेरॉक्स, तहसीलसमोर,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६०
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. नागनाथ राचय्या स्वामी,<br>रा. निलंगा, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>राज्य परिवहन महामंडळ,लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक व्यवस्थापक,<br>राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय,<br>औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विभागीय वाहतुक अधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ,लातूर
जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २२.०४.२००८ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांच्याकडे काही माहिती मागविली असता, ही माहिती त्यांना दि. ०५.०६.२००८ रोजी दिली. वास्तविक पाहता, ही माहिती त्यांना दि. २१.०५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी मिळावयास हवी असताना, त्यांना १४ दिवस उशिराने प्राप्त झाली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ ते ७ च्या संदर्भातील त्यांना प्राप्त माहिती चुकीची, विसंगत व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी

दि. १७.०६.२००८ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक,राज्य परिवहन महामंडळ,औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणी घेण्याच्या ऐवजी त्यांनी त्यांच्या दि. २१.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचा अपील अर्ज अपिलार्थीस परत पाठवून दिला. प्रादेशिक व्यवस्थापक यांची ही कृती अप्रस्तुत वाटल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपाल वाहतुक करणाऱ्या बसेस वेळेवर नियमितपणे सोडत नसल्याबाबतच्या विषयावर जानेवारी, २००८ ते दि. २२.०४.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. १३.०५.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.०६.२००८ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.२१.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांना परत पाठविले व सदरचे अपील विभाग नियंत्रक, राज्य परिवहन कार्यालय,लातूर यांच्याकडे करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. २२.०४.२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांना दि.१३.०५.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडील

उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविल्या गेलेल्या मुद्दा क्र. १ ते ३ शी संबंधित माहिती त्यांना बरोबर असल्याचे आढळल्याचे त्यांनी कबूल केले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या पत्रातील मुद्दा क्र. ४ ते ७ शी संबंधित माहितीशी अपिलार्थी सहमत नाहीत. ती त्यांना चुकीची, दिशाभूल करणारी वाटत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केले नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती जर त्यांना चुकीची आणि दिशाभूल करणारी वाटत असेल तर त्यांना अधिनियमातील कलम .१९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम राज्य परिवहन महामंडळाने या प्रकरणाशी संबंधित नेमलेल्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अधिनियमातील तरतुदीप्रमाणे करणे भाग होते. त्यांनी सदरचे अपील विभाग नियंत्रक यांच्याकडे करण्याच्या ऐवजी प्रादेशिक व्यवस्थापक, औरंगाबाद यांच्याकडे केले. प्रादेशिक व्यवस्थापक यांनी सदर अपील अर्ज अपिलार्थीस परत पाठवून त्यांना विभाग नियंत्रक यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले. परंतु त्यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने विचाराधीन अपील सरळ आयोगाकडे सादर केले आहे. ही अपिलार्थीची अपील करण्याच्या पध्दतीमध्ये झालेली चूक आहे. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीचा विचार केला असता, त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि.०४.०६.२००८ रोजीच्या पत्रामध्ये पुरविण्यात आलेल्या मुद्दा क्र. ४ ते ७ शी संबंधित माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे अपिलार्थीस का वाटते, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. याहीपेक्षा महत्त्वाचे हे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मुद्दा क्र.४ ते ७ द्वारे विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णत: विसंगत आहे. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबाबतची व कृतीची कारणे, स्पष्टीकरणे व अभिप्राय

अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे.याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या निर्णयाची,कृतीची कारणे,स्पष्टीकरणे अथवा अभिप्राय देणे वा अर्जदाराच्या शंकांना अथवा प्रश्नांना उत्तरे देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा मूळातच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समावेश नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते, ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये समाविष्ट आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ ते ७ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही व उर्वरित देय माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागनाथ राचय्या स्वामी,२-६३,'पार्वती मॅन्शन', कोळ्ळे गल्ली,निलंगा, जि.लातूर-४१३५२१.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६१
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

१. श्री. सय्यद मोहियोद्दीन अहमदसाब, : अपिलार्थी
रा. देगलूर, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद,देगलूर,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देगलूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखापाल, नगर परिषद, देगलूर, जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे व अधिनियमातील तरतुदीनुसार दंडीत करण्यात यावे आणि श्री. व्ही.एम.कांबळे, माहिती अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१०.२००७ रोजी जा.क्र.३५२२ नुसार दिलेल्या मालकीहक्काच्या पत्रासंदर्भात एकूण चार मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु.४/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. १३.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रु.४/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे अनुमान काढले व अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची मागणी, अधिकाराअभावी अमान्य केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना त्वरित प्राप्त व्हावी व तसेच या प्रकरणी अपिलार्थीस प्रथम अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना दंड करावा.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि.२०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सर्व उपलब्ध माहिती दिली आहे. यावर आयोगाने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात त्यांनी विचारलेली माहिती दिली

का, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारले असता, त्यांना आयोगास यासंदर्भात कोणताही खुलासा करता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.१ व ४ च्या संदर्भातील अपेक्षित माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून बाबूखादरशाह यांना दिलेल्या मालकी हक्काचे प्रमाणपत्र कोणत्या पुराव्या आधारे दिले, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी अशाप्रकारची प्रमाणपत्रे नगर परिषदेच्या मालमत्ता रजिस्टरवरुन दिली जात असल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, मालमत्ता रजिस्टरमध्ये एखाद्या व्यक्तीच्या नावाची नोंद झाल्यास त्या व्यक्तीचे मालमत्तेच्या मालकीहक्काचे प्रमाणपत्र नगर परिषदेकडून देण्यात येते. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी नगरपरिषदेकडील मालकीहक्क प्रमाणपत्र देण्याची पध्दत थोडक्यात विशद करुन पत्राद्वारे कळवावी, म्हणजे अपिलार्थीचे समाधान होऊ शकेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.१०.२००७ रोजी नगर परिषद,देगलूरचे मुख्याधिकारी कोण होते व ३५२२ या क्रमांकाचे प्रमाणपत्रावर कोणत्या मुख्याधिकाऱ्यांची स्वाक्षरी आहे व ते मुख्याधिकारी केव्हापासून कार्यरत आहेत, ही माहिती मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याची नोंद असलेल्या आस्थापना रजिस्टरची संबंधित प्रत अपिलार्थीस द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे मागणी केलेली -"------क्रमांकाचे व तारखेचे मालकी प्रमाणपत्र देताना मूळ संचिकेला मान्यता देणारे मुख्याधिकारी कोण ?" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अशाप्रकारच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मते अथवा त्यांचे अभिप्राय मागण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये नाही. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने

त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात निर्णय घेऊन उपलब्ध माहिती अर्जदारास देणे अथवा नाकारणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०३.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीकडून स्वीकारलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४/- इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व ४ च्या संदर्भातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अंशतः माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद मोहियोद्दीन अहेमदसाब,द्वारा आदर्श व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र,रामपूर रोड, देगलूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६२
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

१. श्री. माधव रामराव वडजे, : अपिलार्थी
राा.खंडगाव (ह.),ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,कंधार,जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कंधार तालुक्यातील दारिद्रयरेषेखालील यादीसंदर्भात एकूण २१ मुद्याद्वारे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२६,१,४१६/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता, या अधिनियमातील कलम १९(१)

च्या तरतुदीनुसार दि.२३.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून द्वितीय अपील केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि.३१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.२६,१,४१/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मूळ माहितीची व्याप्ती कमी केली व फक्त २५ पृष्ठांची माहिती त्यांना आवश्यक असल्याने तितकीच माहिती द्यावी, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.१०.२००८ रोजी एकूण २५ पृष्ठांची माहिती विनामूल्य हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०७.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविल्यानंतर दि. १६.१०.२००८ रोजी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने त्यांना आता माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.१४६२/०८, दि.२८.०७.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव रामराव वडजे, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,नांदेड जिल्हा सहसचिव,मु.खंडगाव(ह.), ता.कंधार,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६३
निर्णय दिनांकः ०१-१०-२००९

१. श्री. केरबा राजाराम भागवत, : अपिलार्थी
रा.हयातनगर,ता.वसमत,जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,हयातनगर,ता. वसमत, जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,पंचायत समिती,
वसमत,जि.हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती मिळाली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, हयातनगर, ता.वसमत यांच्याकडे ग्रामपंचायतीशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण सात मुद्यांद्वारे व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार

दि.२६.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे, आयोगास गरजेचे वाटते. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती,वसमत, यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केरबा राजाराम भागवत, मु.पो.हयातनगर,ता.वसमत, जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हयातनगर,ता.वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६४

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी

नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जहांगीर

मोहा, पोस्ट चोंडी, तालुका धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर, तालुका

धारुर, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. अभिमान रंगनाथ बोधवड हे जन माहिती अधिकारी यांच्या शाळेत सन १९७९ ते ८१ या वर्षात पहिली वर्गात शिकत होते, त्यांची टी. सी. व निर्गम उता-याची व त्यांच्या वडिलांनी सादर केलेल्या जन्माच्या दाखल्याची सत्यप्रत ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्रयस्थ पक्षाच्या निर्गम उता-याची प्रत अपिलार्थीस

विनामूल्य पुरविली व अपिलार्थीच्या टी. सी. व त्यांच्या वडिलांनी सादर केलेल्या जन्म दाखल्याची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये शिक्षण संस्थांच्या संदर्भात संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिका-यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली आहे. असे असतांना अपिलार्थीने शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर यांच्याकडे म्हणजेच, चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात आहे. ही माहिती घेऊन अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी फक्त 'न्यायालयीन व सामाजिक कामासाठी आवश्यक' एवढेच त्यांचे अभिप्राय दिलेले आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत. या सर्व बाबी एकत्रित पाहता,

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जहांगीर मोहा, पोस्ट चोंडी, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६५

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपिलार्थी
मंगळवारा बाजार, हिंगोली, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा बालविकास प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बालविकास सेवायोजना, जिल्हा परिषद, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(महिला व बालकल्याण विभाग), जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती अप्राप्त आहे व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामध्ये फेब्रुवारी २००८ मध्ये अंगणवाडी मदतनीस व सेविका यांच्या केलेल्या नियुक्त्यांसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - रिक्त पदे, मान्य प्रस्ताव, भरती प्रक्रियेसंदर्भात कार्यालयीन टिपणीसह संपूर्ण संचिकेची झेरॉक्स प्रत, निवडण्यात आलेल्या उमेदवारांच्या अर्ज संचिकेच्या संपूर्ण झेरॉक्स, निवड समितीच्या अधिका-यांचा तपशील व भरतीसंदर्भात भरती उमेदवारांना देण्यात आलेल्या गुणतक्त्याच्या झेरॉक्स प्रती, भरतीसंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेले आदेश, परिपत्रक व मार्गदर्शक तत्वाच्या झेरॉक्स प्रती आणि फेब्रुवारी २००८ मध्ये भरतीच्या संदर्भात देण्यात आलेल्या जाहिरातीची झेरॉक्स प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०७-२००८, ०५-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले, त्यामुळे अपिलार्थीच्या अनुपस्थितीत जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्या दि. ०५-०८-०८ रोजीच्या निर्णयाद्वारे फेटाळले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दिनांक २१-०७-२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले होते.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार करुन ठेवली व अपिलार्थीची माहिती घेऊन जाण्यासाठी वाट पाहिली. परंतु अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती

पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे व ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना ही माहिती त्यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना प्रत्येक अर्जदाराने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यामाद्वारे माहिती अपेक्षित आहे याचा तपशील देणे त्यांना भाग आहे. त्याप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः हा पर्याय त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी निवडला होता. एकदा व्यक्तिशः हा पर्याय अर्जदाराने निवडला की त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाची पुढील प्रत्येक घडामोड ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदारावर आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळेस सुनावणी ठेवली असता त्या सुनावणीसाठी अपिलार्थी हजर झाले नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २३२ इतके भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००८ रोजी कळवूनही या शुल्काचा भरणा करण्याची तयारी देखील अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी आयोगासमोर अनुपस्थित आहेत. त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सशुल्क उपलब्ध आहे. अपिलार्थीस अद्यापही या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाशी संबंधित, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असेल तर, त्यांनी ती माहिती या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे भरुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत हस्तगत करुन घ्यावी, असे

अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत वेगळ्याने स्वतंत्र अर्ज करावा लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवायोजना, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालकल्याण विभाग), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६६

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी
रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, चाकूर,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, चाकूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता त्यांनी जाणुनबुजून अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही. त्यामुळे संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० नुसार प्रतिदिन २५० रुपये प्रमाणे दंडाची व शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित इ. स. १९६१ ते १९८१ या कालावधीतील मौजे जठाळा, तालुका चाकूर येथील सर्व्हे नंबर ५७, ५८, ७२ व ६७ मधील नमुना नंबर ४, ९/३, ९/४ व नमुना नंबर ११ व १२ तसेच पोटहिस्सा मोजणी फेरफार रजिस्टरची सत्यप्रत आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने माहिती अधिकार

अधिनियमातील कलम ४ च्या तरतुदीअंतर्गत केलेल्या १७ कामांची जन माहिती अधिकारी यांनी ही कामे पूर्ण केल्याबाबतची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीने माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ पोचसही दिली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, चाकूर यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यानी अपिलार्थीचा सदरचा अपील अर्ज विनाकार्यवाही तसाच त्यांच्याकडे ठेऊन घेतला. परिणामी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने ते आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहिले व तद्नंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक १९-०६-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीने त्यांना दिलेल्या पोच सहीची प्रत आयोगास सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीची असलेली सही व अपिलार्थीची आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावरील सही यामध्ये लक्षणीय फरक आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस खरोखरच ही माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांनी सुनावणी घेतली नसल्याचे देखील आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, चाकूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ३०-०७-२००८ रोजीचा त्यांच्याकडे प्राप्त झालेला प्रथम अपील अर्ज जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पाठवून द्यावा. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यापासून जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६७

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. शंकर इंगळे, : अपिलार्थी

आनंदनगर चौक, नांदेड - ४३१ ६०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

शालेय पोषण आहार, जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांना माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने टाळले त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाची राहिलेली त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोफत प्राप्त व्हावी व माहिती अधिकाऱ्याविरुध्द अधिनियमातील कलम २० (१) व (२) नुसार कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे राबविण्यात येत असलेल्या शालेय पोषण आहाराचे अनुदान वाटप व खर्चाबाबत जानेवारी २००४ ते अपिलार्थीस माहिती देईपर्यंतच्या कालावधीशी संबंधित संपूर्ण माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे त्यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार नसल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित माहिती २० दिवसात देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रमाणित करुन अपिलार्थीस व्यक्तिशः दिली आहे. या संदर्भातील आवश्यक तो पुरावा आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे मागितला असता, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी अशा प्रकारचा पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. तथापि यासंदर्भातील पुरावा आता त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन

माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा हा युक्तिवाद आयोग आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळून लावत आहे आणि जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोच त्यांच्या दप्तरी नोंद करुन ठेवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने आयोग अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहिती-पैकी मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड - ४३१ ६०५.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६८

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, : अपिलार्थी
" गुरुप्रसाद ", लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व
विकास महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तथा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व
विकास महामंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई-४०००७१

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही लेखी खुलासा केला नाही व अपिलीय अधिकारी यांनी या दाखल केलेल्या प्रकरणाची कोणतीही सुनावणी घेतली नाही व दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिशाभूल करणारी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०४-२००३ ते ३१-१२-२००७ या कालावधीतील कर्ज वाटप प्रकरणाशी संबंधित एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महामंडळाने औरंगाबाद जिल्हासाठी दिलेल्या निधीचा वर्षनिहाय तपशील, कर्ज प्रकरणाबाबत महामंडळाकडे अर्ज दाखल करण्यात आलेल्या उमेदवाराची यादी, त्यांची नांवे, शैक्षणिक पात्रता, जात, उमेदवारांनी निवडलेला व्यवसाय, उमेदवाराने मागणी केलेल्या कर्जाचा तपशील, ज्या बँकेकडे महाममंडळाने कर्ज मंजूरीची शिफारस पाठविली त्या बँकेचे व शाखेचे नांव तसेच या कालावधीमध्ये कर्ज मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची अशाच प्रकारची माहिती, त्यांना मंजूर झालेले कर्ज व दिनांक, बँकेचे नांव, कर्ज मंजुरीनंतर परतफेड केलेल्या कर्जाच्या रकमेचा तपशील, आणि आज रोजी सदर लाभार्थींचा व्यवसाय सुरु आहे किंवा कसे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास काही बोगस लाभार्थी आढळले असून त्यांच्याविरुध्द केलेली कार्यवाही - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हे अपील जन अपिलीय अधिकारी या नात्याने सदर महामंडळाच्या औरंगाबाद येथील कार्यालयाकडे केले आहे. परंतु या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून व्यवस्थापकीय

संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांची नेमणूक झालेली आहे. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज औरंगाबाद कार्यालयाने व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे न पाठविता विना कार्यवाही स्वतःकडे तसाच ठेऊन दिला व अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-०४-२००८ रोजी माहिती पाठविली आहे व कथित माहितीची प्रत त्यांनी या पत्रासोबत जोडली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे व यावरुन अपिलार्थीस कोणत्याही कारणाशिवाय माहिती नाकारल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीचा दिनांक २९-०४-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी तात्काळ हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यवस्थापकीय संचालकांकडे पाठवावा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी

त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अथवा कलम १८ च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अथवा तक्रार दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, " गुरुप्रसाद ", लासूर रोड, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, विकास भवन, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई - ४०० ०७१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४६९

निर्णय दिनांक ०१-१०-२००९

१ श्री. नागनाथ राचय्या स्वामी, : अपिलार्थी
२-६३, 'पार्वती मॅन्शन', कोळ्ळे गल्ली, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, निलंगा,
तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०५-२००८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ४ व्दारे प्राप्त झालेली माहिती चुकीची, विसंगत व दिशाभूल करणारी असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'सरकारी नालीवरील अनधिकृत बांधकामाची माहिती मिळणेबाबत' या विषयावर त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९७० ते १९७५ या कालावधीतील माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या चारही मुद्दयावर माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०७-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ वर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सविस्तर व बिनचूक माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००८ रोजी परत माहिती पुरविली. तथापि याही माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास अवगत केले. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांचे घर क्रमांक २-६३ चे एकूण क्षेत्रफळ ६०० चौरस फूट असतांना मालमत्ता कर ९३९ रुपये मात्र सौ. हालगरकर यांचे घर क्रमांक २-५६ चे एकूण क्षेत्रफळ २९१४ चौरस फूट इतके असूनही त्यांना मात्र ४५६० रुपयांऐवजी २३७४ रुपये इतकी कमी आकारणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयातील नगर रचनाकार हे कर आकारणी करण्याकरिता जबाबदार असून अपिलार्थीची वास्तू ते व्यापार प्रयोजनार्थ वापरात असल्यामुळे त्यांना कर आकारणी जास्त दराने केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ४ बाबत आक्षेप आहेत. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याची कार्यवाही का केली नाही अशा स्वरुपाची माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अर्जदाराने विचारणे व त्या कारणांचे स्पष्टीकरण त्यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीस मूळात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांच्यापेक्षा जास्त क्षेत्र असणा-या मालमत्तेवर नगरपरिषदेने कमी कर लावला व अपिलार्थी यांचे कमी क्षेत्रफळ असतांना त्यांना जास्त दर आकारण्याची कृती विसंगत असल्याचे वाटते. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्ष सौ. हलगरकर यांच्या घर क्रमांक २-५६ वर केलेला मालमत्ता आकारणीचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस, त्यांच्या मालमत्ता कर आकारणीच्या तपशीलासह सात दिवसाचे आत विनामूल्य पुरवावा, जेणेकरुन अपिलार्थीचे शंका निरसन होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नागनाथ राचय्या स्वामी, २-६३, 'पार्वती मॅन्शन', कोळ्ळे गल्ली, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७५
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

१. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त, महानगरपालिका,
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उप आयुक्त, महानगरपालिका,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) नगर रचनाकार, महानगरपालिका अहमदनगर
२) वसूली अधीक्षक, महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,४,५ व ७ च्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर शहरातील रस्त्यावरील भाजी विक्री व अतिक्रमण मोहिमेबाबत

एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "महानगरपालिकेने सन २००३ ते दि. १७.०३.२००९ या कालावधीमध्ये शहरातील चितळे रोड ते भराडगल्ली रोड या भागामध्ये भाजी विक्री करणा-या लोकांवर ज्या - ज्या वेळी अतिक्रमण मोहिम राबविली त्यांच्या तारखा व ज्या - ज्या लोकांचे अतिक्रमण काढले त्याबाबतची माहिती, भाजी विक्री करणारे हे नेहरु मार्केटचे गाळा धारक असल्यामुळे त्यांच्याकडून रस्त्यावर भाजी विक्री करण्यासाठी बसल्यावर रु. १०/- प्रमाणे रक्कम घेऊ नये, याबाबतच्या नियम/आदेशाची प्रत, महानगरपालिका अतिक्रमण विभागाची कार्य व कर्तव्य कोणती आहेत त्याची माहिती छापील असल्यास त्याच्या प्रती व रस्त्यावरील भाजी विक्री करणारे लोकांच्या बाबत अतिक्रमण मोहिम राबविण्याबाबत जे निकष आहेत, त्याची माहिती, ५x४ एवढी जागा व्यापण्याचा जो निकष आहे तो महानगरपालिका यांच्या मालकीच्या सर्व रस्त्यासाठी बोळीसाठी लागु आहेत की रस्त्यांच्या रुंदी व वाहतुकीनुसार सदर निकषात बदल होत असल्यास त्याची माहिती व नगररचनाकार यांनी मुख्य राज्य माहिती आयुक्त मुंबई किंवा खंडपीठ नाशिक यांच्याकडे अपील क्र. १२२/०२ व १२७/०२ मध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे जो पूर्तता अहवाल पाठविला त्याच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदरचा अर्ज आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणाशी संबंधित नगर रचनाकार व वरिष्ठ अधीक्षक या दोन माहिती अधिकाऱ्यांची नेमणूक केली गेली असल्याने, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व मूळ अर्ज संबंधितांच्याकडे दि. १७.०३.२००९ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

अपिलार्थीच्या या अर्जास नगर रचनाकार, अहमदनगर, महानगरपालिका यांनी दि. ०६.०४.२००९ व दि. १८.०४.२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०५.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे अनुमान काढून

अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. २१.०५.२००९ रोजी काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, दि. ०६.०४.२००९, ११.०४.२००९ व दि. २१.०४.२००९ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या सर्व शंकांचे त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी समाधान झाले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती यांच्या प्रतिनिधीने व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर शहरातील चितळे रोड व भराडगल्ली या रस्त्यावर ज्या-ज्या वेळी अतिक्रमण मोहिम राबविली त्यावेळी ज्या - ज्या लोकांचे अतिक्रमण काढले त्याच्या तारखा व त्याबाबतची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या मुद्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी असे स्पष्टीकरण केले होते की, महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत शहरामध्ये मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे, विक्रेते, हातगाडीवाले यांनी केलेले अडथळे हटविण्यात येतात. त्याबाबत निश्चित तारखा व अतिक्रमण हटविण्याची अपिलार्थीने मागणी केलेल्या अतिक्रमण धारकांची नावे त्यांच्याकडील अभिलेखात उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. अहमदनगर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटविण्याच्या प्रक्रियेची माहिती आयोगास अवगत करुन दिली असता, उपआयुक्त स्तरावरुन अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले जातात व तदनंतर उपआयुक्त यांच्या आदेशाचे अनुपालन करण्यास्तव संबंधित विभागास सूचित केले जाते. सबब

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २००३ ते दि. १७.०३.२००९ या तारखेपर्यंत उपआयुक्त, महानगरपालिका,अहमदनगर यांनी चितळेरोड ते भराडगल्ली या भागातील भाजी विक्रेत्यांवर अतिक्रमण हटविण्यासाठी ज्या-ज्या वेळी आदेश दिले असतील त्या आदेशांच्या पूर्तता अहवालावरुन त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शोधून काढावी व पूर्तता अहवालाच्या प्रती अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अहमदनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळास अपिलार्थीस भेट देण्याचे सूचित केले. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या संकेतस्थळावर त्यांनी या माहितीशी संबंधित जी माहिती उपलब्ध आहे, त्या माहितीच्या प्रती (Hard Copy) त्यांनी अपिलार्थीस पुरविणे त्यांना भाग आहे. मुद्दा क्र.५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जागा देण्यासाठीचा निकष हा रस्त्याची रुंदी, रस्त्यावरील वाहतुक, लोकसंख्या, बाजारपेठ इत्यादींचा विचार करुन ठेवला जातो, असे मोघम उत्तर दिले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत अशाप्रकारची मोघम माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षित नाही. तेव्हा यासंदर्भात त्यांनी अहमदनगर महानगरपालिकेमध्ये अपिलार्थीने अर्ज करतेवेळी प्रचलीत असलेले निकष अपिलार्थीस कळविणे त्यांना भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयामध्ये त्याची कोणतीही दखल घेतली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी अथवा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मुद्दा क्र.७ ची दखल घेतली नसल्याचे त्यांचे आक्षेप सिध्द होत आहेत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथःक्करण पाहता, ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. २,४,५ व ७ च्या संदर्भात

वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.७ ची दखल न घेऊन अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,४,५ व ७ च्या संदर्भातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, रा.भराडगल्ली, नेहरु मार्केट मागे, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा १) नगररचनाकार, महानगरपालिका, अहमदनगर २) वसूली अधीक्षक महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७६
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार,<br>महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र.४,८ व १० शी संबंधित मुद्यावरील माहितीचा समावेश नाही. मुद्दा क्र. २ शी संबंधित चुकीची व मुद्दा क्र. ३ शी संबंधित अपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३१.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण १० मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.

३०.०४.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०५.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील १० मुद्यांपैकी ९ मुद्यांवर माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दि. २१.०५.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.४ द्वारे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाच्या दि. २३.०१.२००९ रोजीच्या पत्राचा जो उल्लेख केला आहे तो चुकीचा असून, या दिनांकास त्यांनी अपिलार्थीस कोणतेही पत्र दिलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि. २१.०५.२००९ रोजी बरोबर उत्तर दिले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना, अपिलार्थीने महानगरपालिकेकडे भरणा केलेल्या शुल्काच्या पावतीची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१० ची जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती माहिती

दिली नाही, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या या आक्षेपावर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही माहिती मूळात अस्तित्त्वात नसल्याचा युक्तिवाद केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना प्राप्त झालेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले पृथःक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ मधील त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या शुल्काच्या पावतीची झेरॉक्स प्रत व मुद्दा क्र.१० च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांच्याकडे करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अ [illegible] कृ.मा.प.४... १० च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश [illegible] दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर,रा.भराडगल्ली, नेहरु मार्केटच्या मागे, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७७
निर्णय दिनांकः ०३-१०-२००९

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय (मराठी माध्यम),
नेवासा फाटा, जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी,
संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय (मराठी माध्यम),
नेवासा फाटा, जि. अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश अद्यापपावेतो त्यांना प्राप्त झालेले नाहीत. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २६.०५.२००९ रोजी धमकीवजा पत्र त्यांना प्राप्त झाले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२७.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अध्यापक विद्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली आहे. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०५.२००९ रोजी संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील नमूद केलेल्या मुद्यांशी सुसंगत असा युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०५.२००९ रोजी संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. तथापि या अपील अर्जावर अद्यापपर्यंत अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी झाली नसल्याचे दिसून येत आहे. खाजगी अध्यापक महाविद्यालाशी संबंधित  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे, आयोगास गरजेचे वाटते. सबब संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत खाजगी अध्यापक महाविद्यालयाच्या संदर्भातील माहितीसाठीच्या मूळ अर्जावरील प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरावर जन अपिलीय अधिकारी यांची हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत प्रथम नेमणूक करावी व  सदर प्रकरणातील प्रथम अपिलावर निर्णय घेण्यासंदर्भात सूचना पारित कराव्यात. याबाबतचा अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करण्यात यावा. यानंतर अपिलार्थीने संचालक, एस.सी.ई.आर.टी.म.रा.पुणे यांनी नेमलेल्या जन अपिलीय अधिकाऱ्याकडे त्यांच्या दि.२७.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत प्रथमतः सादर करावी. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि.

२७.०५.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांच्याकडे प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, रा. घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी, (जुने मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय (मराठी माध्यम), नेवासा फाटा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, संत ज्ञानेश्वर अध्यापक विद्यालय (मराठी माध्यम), नेवासा

फाटा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७८
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

१. श्री. पांडुरंग रंभाजी नेव्हे, : अपिलार्थी
राा.माळकूप, ता.पारनेर,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, पारनेर शिक्षण विभाग,
ता. पारनेर, जि. अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांची सेवापुस्तिका नसल्यामुळे त्यांना वरिष्ठ श्रेणी शिक्षण खात्याने दिली नाही व ते आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत व सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे त्यांची सुधारित पेन्शन त्यांना आता मिळणार नाही व आर्थिक तोटा होणार असल्याच्या शंकेने त्यांचे मानसिक स्थितीवर परिणाम होईल, त्यामुळे अपिलार्थीस न्याय मिळावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२५.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली आहे.

"सेवापुस्तक मिळणेबाबत मी प्रथम गट विकास अधिकारी साहेब पं.सं.अकोले ता.अकोले व मा. गट शिक्षणाधिकारी पं.स.(शिक्षण विभाग) अकोले यांच्याकडे माहितीच्या अधिकारी, या अन्वये पत्रव्यवहार केलेला आहे. सोबत त्यांचा खुलासा जोडलेला आहे. त्या खुलासेवरुन आपणाकडे सेवापुस्तकाची मागणी करीत आहे. कृपया माझे सेवापुस्तक मला मिळावे, ही विनंती. माझी सेवा या तालुक्यात ९९% टक्के झालेली आहे. शोध लागला नाहीच तर सेवापुस्तक (नवीन) तयार करुन मिळावे,ही नम्र विनंती."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांनी दि. १४.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीची सेवापुस्तिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले व नवीन सेवापुस्तिका तयार करुन देणे हे माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नसल्याचेही त्यांनी अपिलार्थीस अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०६.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्याकडील दि. १३.०७.२००९ च्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन या प्रकरणी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अकोले व पारनेर हे प्रथम अपिलीय अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे प्रथम अपील करावे, असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती अकोले, जि. अहमदनगर व पंचायत समिती पारनेर, जि. अहमदनगर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर उपस्थित आहेत. अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती अकोले यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रतीवरुन त्यांनी आता अपिलार्थीस सेवापुस्तिका जवळपास पूर्ण करीत आणली आहे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या लाभ विहित

मुदतीत अपिलार्थीस मिळतील अशाप्रकारची दक्षता घेण्यात येत आहे. गट शिक्षणाधिकारी, अकोले यांनी अपिलार्थीची सेवापुस्तिका ते १५ दिवसांच्या आत तयार करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन देतील, असे आयोगास आश्वासित केले आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीस ते सेवानिवृत्त होण्यापूर्वीच वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर झाली होती.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या सेवापुस्तिकेकरिता माहिती अधिकाराचा मार्ग अवलंबिला आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, सेवानिवृत्ती नियमातील कलम ३७ अन्वये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास स्वत:ची मूळ सेवापुस्तिका त्यांच्या नेमणूक प्राधिकाऱ्याकडून कधीही उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र त्यांची प्रत अपिलार्थीस  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागता येईल. या प्रकरणी अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली असेल तर ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असू शकणार नाही. तथापि एखाद्या कर्मचाऱ्याची सेवापुस्तिका गहाळ होणे, ही बाब आयोग गांभीर्याने घेत असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका, जिल्हा परिषदेच्या ज्या कर्मचाऱ्याच्या हाताने गहाळ झाली आहे, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक अथवा आवश्यक वाटल्यास, फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी.

अपिलार्थीची सेवापुस्तिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाची आहे. मूळात या विभागाने आपली जबाबदारी पूर्णपणे पार न पाडल्यामुळे अपिलार्थीस त्यांची सेवापुस्तिकेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सेवापुस्तिकेच्या दुय्यम प्रतीवरुन अथवा इतर कागदपत्रावरुन शिक्षण विभागाला अपिलार्थीचे सेवापुस्तक परत नव्याने तयार करावे लागेल. अपिलार्थीने देखील त्यांच्या मूळ अर्जामध्ये अशाचप्रकारची विनंती केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी गट शिक्षणाधिकारी अकोले यांनी अपिलार्थीस त्यांचे संपूर्ण सेवापुस्तक येत्या १५/२० दिवसांच्या आत तयार करुन त्याची प्रत अपिलार्थीस देण्याचे आयोगासमोर मान्य केले

आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिकेची सत्यप्रत, त्यातील नोंदी अद्ययावत करुन त्याची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

गट शिक्षणाधिकारी, अकोले हे आपली जबाबदारी या कालावधीमध्ये पूर्ण करुन अपिलार्थीस माहिती देतील याची दक्षता शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.अहमदनगर यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत त्यातील नोंदी अद्ययावत करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर यांनी या प्रकरणी अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका जिल्हा परिषदेच्या ज्या कर्मचाऱ्याच्या हाताने गहाळ झाली आहे, त्या कर्मचाऱ्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक अथवा आवश्यक वाटल्यास, फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी / प्रस्तावित करावी.

**अहमदनगर**
**दिनांक ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. पांडुरंग रंभाजी नेव्हे, मु.पो.माळकूप, ता.पारनेर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पारनेर शिक्षण विभाग, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७९
निर्णय दिनांकः ०३-१०-२००९

१. श्री. गोकूळ विलास सातपूते, : अपिलार्थी
रा.मांडवगण, ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा,
जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी दि. २१.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती,श्रीगोंदा यांच्या कार्यालयात अर्ज दाखल केला असता, तीस दिवसांच्या आत माहिती न मिळाल्याने पंचायत समिती, श्रीगोंदा यांच्याकडे प्रथम अपील केले.त्यांनी देखील या अपील अर्जावर ४५ दिवसात काहीही न कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि. ०१.०४.२००५ ते ३१.०३.२००६ या कालावधीतील घरकुल योजनेच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये

- घरकुल लाभार्थ्यांची नावे, लाभ झालेल्या योजनेचे नाव, मंजूर अनुदान,लाभार्थ्यांना अदा केलेली रक्कम, घरकुल बांधुन पूर्ण झाले का? व संडास बांधली आहे का ?- या मुद्यांचा समावेश होता.अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे,'समक्ष'स्वरुपात अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे, अपिलार्थीने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २२.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज माहिती अधिकारी,पंचायत समिती, श्रीगोंदा यांना उद्देशून केलेला आहे. अपिलार्थीस सदर अपील अर्ज दाखल केल्यानंतरही पंचायत समिती, श्रीगोंदा येथील अधिकाऱ्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी व पंचायत समितीच्या कार्यालयात गेले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व पंचायत समिती, श्रीगोंदा कार्यालयाकडून त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. या प्रकरणी त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २१.०५.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली अंशतः माहिती अपिलार्थीस देय होत आहे.अपिलार्थीच्या अर्जामधील,"घरकुल बांधून पूर्ण झाले का? संडास बांधले का? " ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण अशाप्रकारची माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे हे माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. मात्र जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्ण बांधकाम झालेल्या घरकुलाच्या व संडासच्या लाभार्थ्यांची यादी उपलब्ध असेल तर त्यांनी अशाप्रकारची यादी अपिलार्थीस, या मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या या अर्जातील उर्वरित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'समक्ष' माहिती मागितली असल्यामुळे, एकदा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व अपिलार्थीने योग्यप्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही सबळ पुरावा, आज रोजी अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील घरकुलाची यादी, योजनेचे नाव,मंजूर अनुदान, लाभार्थ्यांना अदा केलेली रक्कम, घरकुल व संडास बांधून पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची यादी, ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्यामुळे, ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी लागेल, यासाठी त्यांचा कोणताही प्रतिनिधी अनुज्ञेय असणार नाही.

अपिलार्थीस दि. २२.०६.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. गोकुळ विलास सातपुते, मु. पो. मांडवगण, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पंचायत समिती कार्यालय, श्रीगोंदा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०
निर्णय दिनांकः ०३-१०-२००९

१. श्री. रोहिदास राधुजी दातीर, : अपिलार्थी
रा. राहुरी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर,
ता. अकोले, जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर,
ता. अकोले, जि. अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्पाधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर, ता.अकोले यांच्याकडे दि.०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कन्यादान योजना, पी.व्ही.सी. पाईप योजना, महिला बचतगट, शिलाई मशीन, गॅस, वाटप, भजनी साहित्य, घरघंटी व गाईशेळ्या म्हशी वरील

योजनेतील प्रत्येक लाभार्थ्यांची यादी व प्रत्येक लाभाधारकांच्या कागदपत्रांची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०७.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी अपिलार्थीस एकदा काही माहिती दिली आहे व उर्वरित माहिती आज सोबत आणली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस ते दोन टप्प्यात माहिती देत असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी कधी प्रतिसाद दिला आहे, हे ते आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास सांगू शकत नाहीत. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली किंवा कसे व त्याबाबत काय निर्णय झाला याबाबतही त्यांना आज रोजी आयोगासमोर काहीही स्पष्टीकरण सादर करता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०३.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी याबाबत कोणती माहिती दिली व आता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी कोणती माहिती सोबत आणली आहे, हे

आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. रोहिदास राधुजी दातीर (पत्रकार), रा.पो.बॉ.नं.३१, राहुरी, ता. राहुरी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्पाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८१
निर्णय दिनांकः ०३-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. भाऊसाहेब नारायण पाटील,<br>रा. कुकाणा, ता. नेवासा, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण<br>कंपनी मर्या., नेवासा, जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण<br>कंपनी मर्या., अहमदनगर, जि. अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.०३.१०.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीवर त्यांची कोणतीही तक्रार नसल्याने, आयोगाकडे विचाराधीन असलेले अपील क्र. ८१/०९ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

या पत्रामध्ये त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची सदरची विनंती, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने, मान्य करण्यात येत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ८१/०९ , दि.२२.०५.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब नारायण पाटील, द्वारा श्री. लक्ष्मी किराणा स्टोअर्स, कुकाणा, ता. नेवासा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नेवासा, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., अहमदनगर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८२
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

१. श्री. बळीद संदिप बाबुराव, : अपिलार्थी
रा.हत्राळ,ता. पाथर्डी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक),
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो आदेश मिळाले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे जाटदेवळे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथे सन २००१ ते २००२ या वर्षामध्ये ४% सादिल योजना अनुदानामधून मंजूर असलेल्या २ शाळा खोल्या दुरुस्तीविषयी काही माहिती मागितली होती, तथापि मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार

दि. ०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामधील निवेदनाशी सुसंगत असा युक्तिवाद केला.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. ०२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे, आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०२.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. बळीद संदिप बाबुराव, मु.हत्राळ, पो.ता. पाथर्डी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८३
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. भंडारी रसिकलाल किसनलाल,<br>रा. श्रीरामपूर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>दादा वामन जोशी मराठी शाळा, श्रीरामपूर,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>हिंद सेवा मंडळ, अहमदनगर. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कै. सौ. विद्या रसिकलाल भंडारी यांच्या वेतनातील दिनांक ०१.०१.१९८६ पासून काढलेल्या फरकाबाबत दोन मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अथवा पोस्टाने अशा दोन माध्यमाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने संस्थेच्या सचिवांकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे दर्शवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी प्रथम मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. १७.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. तथापि संस्थेला केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने ते त्रयस्थ पक्ष कै. विद्या रसिकलाल भंडारी यांच्याविषयी माहिती मागवून संस्थेच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण करीत असतात. यापुढे त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज केल्यानंतर त्यांच्या शाळेस उन्हाळयाच्या सुटया सुरु झाल्यामुळे सुटीच्या दिवसांचा कालावधी हे माहिती देण्यासाठीच्या कालावधीमध्ये समाविष्ट नसल्याचे त्यांनी एका पुस्तकात वाचल्यावरुन त्यांनी सुटीचा कालावधी धरुन तीस दिवसांच्या आत माहिती पुरविली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः अथवा पोस्टाने अशा दोनही पर्यायाची/माध्यमाची निवड केली

होती. अपिलार्थीची ही कृती चुकीची आहे.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०६.२००९ रोजी माहिती दिल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो पुरावा म्हणून त्यांच्या संस्थेकडील टपालाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. या पत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही त्यावर उपलब्ध नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असा निष्कर्ष निघू शकतो.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शाळेला अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर लागलीच उन्हाळयाच्या सुटया लागल्यामुळे त्या अपिलार्थीस माहिती पुरवू शकल्या नाहीत, हा त्यांचा युक्तिवाद आयोग पूर्णतः अमान्य करीत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ७ मध्ये विहित केलेला कालावधी हा सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना नियमितपणे उपलब्ध होणाऱ्या सुटया लक्षात घेऊनच विहीत केलेला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे गृहीतक की, उन्हाळयाच्या सुटीचा कालावधी हा अर्जदारास माहिती देण्याच्या कालमर्यादेमध्ये समाविष्ट नाही, हे पूर्णतः चुकीचे आहे. इतःपर त्यांनी ही बाब लक्षात ठेवून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आयोगास जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या पत्रामध्ये त्रयस्थ पक्षास वरिष्ठ वेतनश्रेणी दि. ०१.०६.१९९१ पासून रु. १५२०/- व दि.०१.०६.१९९२ पासून रु. १५६०/- ही वाढ जून, १९९३ या महिन्याच्या वेतनापासून लागू करण्यात आली असल्याचे म्हटले आहे व त्रयस्थ पक्षास त्यांच्या वरिष्ठ वेतन श्रेणी वेतनातील फरक रु.५३३६/- इतके त्यांना देण्यात आल्याचेही त्यामध्ये नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०६.२००९ रोजी पुरविलेली कथित माहिती ही, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. तथापि अद्यापपावेतो अपिलार्थीस ती उपलब्ध झाली नाही, असे वरील

परिच्छेदावरुन आवश्यक त्या पुराव्याअभावी सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः व पोस्टाने अशा दोनही माध्यमांचा उल्लेख केलेला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांपर्यंत पूर्वनियोजित कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व्यक्तिशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य देण्यासाठी उपलब्ध करुन ठेवावी व या कालावधीत अपिलार्थीने स्वतः समक्ष हजर राहून ही माहिती स्विकारावी. यासाठी अपिलार्थीस त्यांचा कोणताही प्रतिनिधी अनुज्ञेय असणार नाही तसेच या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती या प्रकरणासंदर्भात विनामूल्य उपलब्ध असणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी
कृ.मा.प.५...
केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमि त पूर्वनियोजित कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व्यक्तिशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत देण्यासाठी उपलब्ध करुन ठेवावी.

**अहमदनगर**
**दिनांक ०३-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. भंडारी रसिकलाल किसनलाल, रा.संगमनेर रोड, मु.पो.ता. श्रीरामपूर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा,

श्रीरामपूर, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

१. श्री. विश्वनाथ तुकाराम शिंदे, : अपिलार्थी
रा. संगमनेर, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
संगमनेर, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा,
अधीक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने आणि खरी माहिती दडवून ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२७.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या जमिनीची हद्द कायम करणे बाबत एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०४.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०५.२००९ रोजी अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेल्या वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोघम व सर्वसाधारण स्वरुपात माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भातील माहिती आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- "मोजणी केल्यानंतर किती दिवसात मोजणी नकाशाची प्रत व त्यासंदर्भातील कागदपत्रे जमीनधारकास देण्याची शासकीय नियमात तरतुद आहे?" -अशी माहिती मागितली होती. यावर आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीच्या मुद्यासंदर्भात शासनाचे काही परिपत्रक अथवा त्यांच्या कायद्याच्या संहिते(Manual)मध्ये अशाप्रकारचे लेखी आदेश आहेत किंवा कसे, याची विचारणा केली असता, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या मुद्यासंदर्भात जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख,म.रा. यांच्याकडून दि. ०१.०१.२००० रोजी पारित केलेले एक परिपत्रक आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केले. हे परिपत्रक म्हणजे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या मुद्दा क्र.५ च्या संदर्भातील माहितीशी सुसंगत माहिती असल्याचे दिसून येत आहे. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, म.रा. यांचे दि. ०१.०१.२००० च्या परिपत्रकामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीशी संबंधित सर्व सुक्ष्म तपशील उपलब्ध आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या परिपत्रकाची प्रत देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी आयोगास सादर केलेल्या या परिपत्रकाची एक प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ च्या संदर्भातील वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: ०३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विश्वनाथ तुकाराम शिंदे, रा.इंदिरानगर गल्ली नं. ४ संगमनेर, ता.संगमनेर, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ८५/०९ व ८६/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५ व ८६
निर्णय दिनांक: ०३-१०-२००९

१. श्रीमती तांबे मंडाबाई लक्ष्मण, : अपिलार्थी
रा. माळीबाभूळगाव, ता. पाथर्डी,
जि. अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत माळीबाभुळगाव,
ता.पाथर्डी, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती,पाथर्डी,जि. अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची एकाच प्राधिकरणाच्या माहितीशी संबंधित दि.१६.०६.२००९ व ०२.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, अनुक्रमे अपील क्र. ८५/०९ व ८६/०९ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र.८५/०९:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेची नोंद करण्यासाठी विनंती अर्ज व खरेदीखताची नक्कल देऊनही, लाच न दिल्याने संबंधित ग्रामसेवक खरेदीखताची नोंद करीत नाही.तसेच त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भात होणाऱ्या सुनावणीसाठी गैरहजर राहून माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत माळी बाभुळगाव, ता.पाथर्डी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ऑगस्ट २००८ ते दि. २३.०३.२००९ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने, उमाजी / म्हातारदेव /नामदेव बन्सी यांच्याकडून खरेदी केलेल्या जागेची नोंद होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहे सप्टेंबर. ०८ मध्ये खरेदीखताची नक्कल व अर्ज दिला होता. तदनंतर त्यांनी खरेदीखताची नोंद होण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा अर्ज केला? जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहे सप्टेंबर. २००८ पासून ग्रामपंचायत मासिक/ग्रामसभा आजपर्यंत झाली नसून मासिक/ग्रामसभेमध्ये हा विषय घेऊ, असे बनवाबनवीची उत्तरे दिली आहेत काय? उत्तरे दिली असल्यास किती वेळा तोंडी उत्तरे दिली? माहे ऑगस्ट २००८ ते दिनांक २३.०८.२००९ पर्यंत ग्रामपंचायतीच्या मासिक / ग्रामसभांच्या प्रोसीडींगच्या नकला, सरकारी कामकाज करण्याच्या सनदेप्रमाणे खरेदीखताची नोंद किती दिवसात करावयाची असते? नोंद न करण्याची कारणे, अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दिला आहे काय? व जागेचे १९७२ सालचे उतारे द्यावेत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०५.२००९ व २९.०५.२००९ रोजी सुनावणी ठेवली असताना देखील जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे सुनावणी होऊ शकली नाही व अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१०.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी हे सर्वसामान्य नागरिकांशी अत्यंत मग्रुरपणे वागतात व त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेची नोंद मालमत्ता रजिस्टरमध्ये घेत नाहीत व त्यांनी माहिती अधिकार अधिनियमानुसार केलेल्या अर्जावर कोणतेही उत्तर देत नाहीत.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित जागेचे सन १९७२ सालापासूनचे उतारे व ग्रामपंचायतीच्या ऑगस्ट २००८ ते मार्च २००९ या कालावधीतील मासिक सभा / ग्रामसभेच्या प्रोसिंडींगच्या नकला या व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने उर्वरित मुद्यांव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित करणारी अशी आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी संदर्भित केलेल्या जागेचे सन १९७२ सालचे ग्रामपंचायतीकडील रजिस्टरमधील उतारे व ग्रामपंचायतीच्या ऑगस्ट २००८ ते दि.२३.०३.२००९ पर्यंतच्या कालावधीत झालेल्या मासिक सभा/ ग्रामसभेच्या प्रोसिंडींगच्या नकला जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, माळीबाभुळगाव, ता.पाथर्डी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना या प्रकरणी रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने संबंधित ग्रामसेवक हे त्यांच्याकडून लाच प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता रजिस्टरमध्ये करीत नाहीत, अशा अर्थाची केलेली तक्रार आयोगास गंभीर स्वरुपाची वाटते, त्यामुळे अपिलार्थीने उल्लेख केलेल्या त्यांच्या जमिनीची नोंद ग्रामपंचायतीच्या रजिस्टरला होण्याबाबत त्यांनी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही त्वरीत करावी, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संदर्भित केलेल्या जागेचे १९७२ सालीचे उतारे व

ग्रामपंचायतीच्या ऑगस्ट २००८ ते दि. २३.०३.२००९ या कालावधीतील मासिक सभा व ग्रामसभेच्या प्रोसिडिंगच्या नकला त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अपील क्र.८६/०९:**

या अपील अर्जासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता, अपिलार्थीने वरील अपील क्र. ८५/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती व प्रथम अपील केले होते त्याच मूळ अर्जाची व अपील अर्जाची झेरॉक्स प्रत त्यांनी विचाराधीन अपील अर्जासोबत जोडली असल्याचे आढळून येत आहे.

या अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाने वरीलप्रमाणे निर्णय दिला आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्र.८६/०९ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.८६/०९, दि.०२.०७.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०३-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्रीमती तांबे मंडाबाई लक्ष्मण, रा. माळीबाभुळगांव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत माळीबाभुळगांव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिलेल्या निर्णयावरील पुनर्विलोकन अर्ज क्र. - १,२ व ३ / २००९**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७२७/०७,२७२८/०७ व ६२४/०८

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. अतुल पाटील : अर्जदार तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी
पोलीस अधिक्षक, मोटार परिवहन
महाराष्ट्र राज्य पुणे.

**विरुध्द**

१ श्री. संतराम काशिनाथ माने पाटील : मूळ अपिलार्थी
रा. ज्योतीनगर औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन
म. रा. औंध पुणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी राज्य माहिती आयोगासमोर अर्जदार श्री. अतुल पाटील यांनी द्वितीय अपील क्रमांक २७२७/०७,२७२८/०७ व ६२४/०८ मध्ये दिनांक १८-०६-२००९ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या आदेशासंदर्भात, सादर केलेले दिनांक २७.०९.२००९ रोजीचे ३ स्वतंत्र पुनर्विलोकन अर्ज विचाराधीन आहेत. या पुनर्विलोकन अर्जाद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वरील तीनही प्रकरणी त्यांच्या दिनांक २७.०९.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे असे नमूद केले आहे की, अपिल सुनावणीच्या नोटिसा त्यांना सुनावणीच्या दिवशीच म्हणजे दिनांक १८.०६.२००९ रोजी मिळाल्यामुळे ते सुनावणीस हजर राहून त्यांची बाजू मांडू शकले नाहीत. तसेच त्या दिवशी सुनावणी ३ आठवडे पुढे ढकलल्यासंबंधी फॅक्सद्वारे विनंती केली होती. परंतु त्यांचे म्हणणे न ऐकता त्याच दिवशी त्यांचे गैरहजेरीत निर्णय देण्यात आला आहे. त्या दिवशी त्यांचे म्हणणे न

ऐकता दिलेला निर्णय त्यांच्यावर अन्यायकारक असून त्यांच्या प्रस्तुत पुनर्विलोकन अर्जांचा विचार करुन त्यांना दोषमुक्त करण्याची विनंती केली आहे. या अर्जामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी केलेल्या कारवाईची पुढीलप्रमाणे माहिती दिली. अर्जदार श्री. माने पाटील यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही मुद्यावरील माहिती इतर कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी त्यांना विलंब लागला. माहितीचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळी ते दिर्घ रजेवर होते. दि. २२.०२.२००७ रोजी रजेवरुन आल्याबरोबर माहितीच्या अर्जाबाबत माहिती घेवून ती दि. २६.०२.२००७ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आली. तसेच या प्रकरणी मागितलेली माहिती ही व्यक्तिगत स्वरुपाची असल्यामुळे कायद्यातील कलम ११ मधील तरतूदीनुसार ती द्यावी किंवा कसे याबाबत संबंधिताकडे दि. २६.०२.२००७ च्या पत्राने विचारणा करुन निर्णय घेऊन अर्जदारास कळविण्यात आले. सर्व माहिती प्राप्त झाल्यावर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात आली असून त्यांनी अर्जदारास आवश्यक माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीचे अपिल विहीत कालावधीनंतर ७-८ महिने विलंबाने दाखल केलेले असून ही अपीले मुदतबाहय असल्याने विचारात घेण्यात येऊ नये अशीही त्यांनी विनंती केली आहे. वरील परिस्थितीत त्यांच्या निवेदनांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन दिनांक १८.०६.२००९ रोजी दिलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करुन त्यांना दोषमुक्त करावे, अशी आयोगास त्यांनी विनंती केली आहे.

या प्रकरणातील मूळ अपिलार्थी श्री. संतराम माने पाटील यांनी दिनांक ३०.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना या प्रकरणाशी संबंधित त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना माहिती अधिका-याकडून प्राप्त झाली असून त्यांची आता माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

या प्रकरणातील घटनाक्रम तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण लक्षात घेता असे आढळून आले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेले प्रयत्न, त्यांना दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या सुनावणीचे वेळी

आयोगाच्या निदर्शनास आणता आले नाहीत. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांचेकडे ती त्वरीत उपलब्ध नव्हती, ती त्यांना त्यांचे सहायक माहिती अधिकारी व इतर कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी लागली. दिर्घ रजेवरुन आल्यानंतर त्यांनी तातडीने ४ दिवसात तशी कार्यवाही करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य दिली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले,आयोगाने सदर आदेश पारित करताना लक्षात घेतलेल्या मुद्यापेक्षा वेगळे मुद्दे आता अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७/०९/२००९ च्या तीन स्वतंत्र पुनर्विलोकन अर्जाद्वारे आयोगाच्या निदर्शनास आणले असल्याने व सदर मुद्दे आयोगास मान्य असल्याने, आयोग या निष्कर्षाप्रत आला आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर टाळाटाळ केली नसून त्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे त्यांना सुरुवातीस विहित मुदतीत माहिती देता आली नाही, व अंतिमतः त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली आहे व त्यामुळे दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या दोन्ही आदेशातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये दिलेले शिस्तभंगविषयक कारवाईचे निर्देश वगळण्यात येत आहे.

**आदेश**

१. दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या अपील क्र. २७२७/०७ च्या संदर्भातील आदेशातील मुद्दा क्र. ३ वगळण्यात येत आहे.

२. दिनांक १८.०६.२००९ रोजीच्या अपील क्र. २७२८/०७ व अपील क्र. ६२४/०८ च्या संदर्भातील आदेशातील मुद्दा क्र. ४ वगळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतराम काशीनाथ माने-पाटील, "कहेष्हा" २४, न्यू एस. बी. एच. कॉलनी, ज्योतीनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ०७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८०

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,<br>मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल,<br>नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नांदेड यांच्याकडे दिनांक ०८-०३-२००८ रोजी पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलेट अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जाची सुनावणी ठेऊनही जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्यामुळे व त्यांच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्यामुळे व त्यांच्या अपिलावर जन अपिलीय

अधिकारी यांनी  निर्णय प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कायम नियुक्तीसाठी दिलेली जाहिरात, दैनिक "वरके ताजा" या वृत्तपत्रात ही जाहिरात प्रकाशित करण्याकरिता माहिती अधिकाऱ्याने   दिलेल्या आदेशाची प्रत, दिनांक २५-०९-९७ रोजी प्रकाशित झालेल्या दैनिक "वरके ताजा" या वृत्तपत्राचा मूळ अंक, यासंदर्भात वृत्तपत्राच्या संपादकानी या जाहिरात छपाईपोटी दिलेल्या बिलाची सत्यप्रत आणि सदर बिलाची रक्कम शाळेच्या खर्चात नोंदविलेल्या किर्द माहे मे ते जून १९९७ ची सत्यप्रत, या जाहिरातीचा खर्च ज्या खात्यामध्ये समाविष्ठ केला आहे त्या अकाऊंटच्या सत्यप्रती ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीस ज्या मुद्दयाच्या प्रती आवश्यक होत्या त्याकरिता एकूण शुल्क रुपये ४५ इतके त्यांना संस्थेच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२००८ व ०३-०७-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती.  तथापि सुनावणीसाठी अपिलार्थी हजर न राहिल्यामुळे अंतीमतः जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याचे सूचित केले.  हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.   परंतु अपिलार्थीने व्यथित होऊन  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत व अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद पाहता त्यामध्ये असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि संस्था व हायस्कूल हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना संस्थेच्या कार्यालयात जाऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल. याच पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळवितांना संबधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काचा आवश्यक तो तपशील अपिलार्थीस कळविला नाही. आता सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दैनिक "वरके ताजा" या वृत्तपत्राचा दिनांक २५-०५-१९९७ रोजीचा मूळ अंक ही माहिती मागितली आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास माहितीपोटी मूळ प्रती देण्याची तरतूद नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दैनिक "वरके ताजा" या वृत्तपत्राच्या दिनांक २५-०५-१९९७ च्या मूळ प्रतिमधील संस्थेने दिलेल्या जाहिरातीची झेरॉक्स प्रत त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमिवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४८१/२००८ व १४८२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८१ व १४८२

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

**अपील क्रमांक १४८१/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी अर्ज दाखल केला असता त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची दिनांक ०७-०२-२००८ रोजी सुनावणी ठेऊन प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सना उर्दू हायस्कूलच्या संदर्भात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वैयक्तीक मान्यतेच्या संदर्भात सन २००३ ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती न देता मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नांदेड यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. तथापि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

माहिती अधिकार अधिनियमातील प्रक्रियेमध्ये अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दाखल झालेल्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीन्वये विहित केलेल्या कालावधीमध्ये आपला निर्णय देणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य पार न पाडल्यामुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय वंचित राहिल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अपील क्रमांक १४८२/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १५-१२-२००७ रोजी अर्ज दाखल केला असता त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिनांक २७-०२-२००८ रोजी

सुनावणी ठेवली होती. परंतु ही सुनावणी न घेता अपिलार्थीची दिशाभूल केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड या शाळेस शिक्षणाधिकारी कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००८ रोजी सुनावणी

ठेवली होती. परंतु प्रत्यक्षात ही सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र या संदर्भात कोणतेही आदेश पारीत केले गेले नसल्याचे आयोगास जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अवगत केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक    ०५-१०-२००९**    **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८३

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य : अपिलार्थी
संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा,
नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे दि. ३१-०३-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता त्यांना कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलेट अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्या-कडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील सादर केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२००८ रोजी सुनावणी ठेऊनही ते गैरहजर राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना एलकेजी, युकेजी या वर्गात प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकाकडून घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या जन्मतारखे-च्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती तसेच या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी व नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी प्रत्येक वर्षात मार्च महिन्यात कोणत्या नियमाप्रमाणे प्रवेश दिला जातो या शासकीय निर्णयाची प्रत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००५ ते २००७ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मूळात त्यांना प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीच्या अर्जास त्यांनी प्रतिसाद देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ व अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला नाही याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे शपथपत्र आयोगास सादर केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. तसेच अपिलार्थीने

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जरी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठवून दिला असल्याचे नमूद केले असले तरीही याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार परत नव्याने अर्ज करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४८४/२००८ व १४८५/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८४ व १४८५

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १४-०३-२००८ रोजी अर्ज दाखल केले असता त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या दोनही अपिलांसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००८

रोजी सुनावणी ठेऊनही सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या दोन वेगवेगळ्या माहितीसाठीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सना उर्दू प्राथमिक शाळेसंदर्भात वेगवेगळी माहिती विचारली होती. अपिलार्थीने हे दोनही अर्ज नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे सादर केल्याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला आहे. त्यावरुन हे दोनही अर्ज उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १७-०८-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या दोनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अशा प्रकारची सुनावणी ठेवल्याचे आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या विचाराधीन दोनही अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जांद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच

तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपले वेगवेगळे आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयांनी समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १४८४/२००८ व १४८५/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, स्वतंत्रपणे सुनावणी घेऊन आपले वेगवेगळे आदेश पारीत करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८६

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत दिनांक २३-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता विहित मुदतीत त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सना उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा (बु.), नांदेड यांनी विद्यार्थ्यांना खिचडी न

देण्याचा ठराव कोणत्या नियमान्वये मान्य केला, या शाळेच्या मुख्याध्यापकाचा असा ठराव नसतांना अध्यक्ष, सना एज्युकेशन सोसायटी यांनी कोणत्या नियमान्वये हा ठराव घेऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला, तसेच सर्वोच्च न्यायालय व केंद्रशासनाच्या योजना न राबविण्याचे अधिकार या शिक्षणसंस्थांना आहे काय ? व कोणत्या नियमान्वये या संस्थेच्या ठरावाआधारे जन माहिती अधिकारी यांनी निर्णय घेतला, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट शिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत दिनांक २९-०१-२००८ रोजी सना उर्दू प्राथमिक शाळा यांच्याकडे पाठविली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सना एज्युकेशन सोसायटीकडून त्यांना दिनांक ०४-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ती अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००८ रोजी पाठविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचा कोणत्याही प्रकारे उल्लेख न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००८ रोजी प्रथम अर्ज केला होता. तथापि या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, सना उर्दू प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या विनंती अर्जावरुन विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार ही योजना न राबविण्याचे ठरविले आहे व या प्रकरणी संस्थेचा ठराव व संबधितांच्या पालकाकडून सोसायटीस प्राप्त झालेल्या विनंती अर्जाची प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००८ रोजी पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचे मूळ

अर्जातील " ......... केंद्र शासनाच्या योजना न राबविण्याचा एखाद्या शिक्षणसंस्थेस अधिकार आहे काय ? " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत आहे. विचाराधीन प्रकरणी व सना उर्दू प्राथमिक शाळा तरोडा (बु.) या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार योजना न राबविण्याचा निर्णय शाळेच्या व्यवस्थापनाने एक ठराव घेऊन केलेला आहे त्या ठरावाची प्रत व पालकांच्या विनंती अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००८ रोजी पाठविली आहे हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती विहित मुदतीत मिळाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा योग्य तो पुरावा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड, यांनी आयोगासमोर सादर केला आहे. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर हजर नाहीत व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे अदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८७

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी अर्ज दाखल केला असता त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व प्रकरण प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मदिनातुल उलूम उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. सय्यद आजम हाशमी सय्यद खाजा यांना राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे दिनांक १४-११-२००७ रोजीच्या निर्णयानुसार लावलेल्या दंडाच्या संदर्भात संबंधित संस्थेने श्री. सय्यद आजम हाशमी सय्यद खाजा यांच्यावर केलेल्या कार्यवाहीच्या माहितीची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या या अर्जाच्या प्रतीवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाची पोचसही आहे. यावरुन हा अपील अर्ज त्यांना प्राप्त झालेला आहे. परंतु यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत केल्याचे आयोगास आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८८

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत दिनांक २८-११-२००७ रोजी अर्ज पाठवून दिला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके भरण्याचे सूचित केल्यानंतर त्यांनी त्या रकमेचा दिनांक २३-०१-२००८ रोजी डी. डी. पाठविला. तथापि शुल्क भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०३-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी ते प्रलंबीत ठेवल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वसमत येथील आदर्श महिला सेवाभावी संस्था संचालीत असास पूर्व प्राथमिक शाळा चालविण्यासाठी संस्थेकडून त्यांना प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रत, त्यांनी मान्यता दिलेल्या आदेशाची सत्यप्रत आणि शाळेच्या मुख्याध्यापकाना बँक खाते उघडण्यासाठी दिलेल्या परवानगीची सत्यप्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही शैक्षणिक वर्ष २००६ या कालावधीशी संबधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके डी डी व्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २३-०१-२००८ रोजीचा ११० रुपयाचा डी डी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पाठविली. परंतु त्यांच्या जावक लिपिकाने प्रत्यक्षतः ती जवळ जवळ तीन आठवडे उशिरा म्हणजेच दिनांक १९-०३-२००८ रोजी पोस्टाने सादर केली. ते होईपर्यंत अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे पाठविली असून त्यांनी पाठविलेल्या माहिती-मध्ये आदर्श सेवाभावी संस्था व शाळा चालविण्यासाठी संस्थेकडून त्यांच्या कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे. तथापि या संस्थेस त्यांच्या कार्यालया-

मार्फत कोणतीही मान्यता दिली नाही तसेच या प्रस्तावित शाळेच्या मुख्याध्यापकास बँकेत खाते उघडण्यासाठी त्यांनी कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतके त्यांच्या कार्यालयात डी. डी. व्दारे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २३-०१-२००८ रोजी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले. सदरचा डिमांड ड्रॉफ्ट निश्चितपणे कधी प्राप्त झाला याची माहिती उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगास देऊ शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००८ रोजी डी डी व्दारे आवश्यक ते शुल्क भरले आहे असा निष्कर्ष आयोग काढत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केलेल्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने प्रत्यक्षात शुल्क भरल्याचा दिनांक पाहता ही माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षात दिनांक २६-०१-२००८ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क देय होत आहे. परंतु या प्रकरणी प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००८ रोजी म्हणजेच देय दिनांकापासून अंदाजे पावणे दोन महिन्याच्या विलंबाने ही माहिती पुरविली आहे असे दिसून येत आहे. पुरविलेल्या माहितीमध्ये संबंधित संस्थेस जन माहिती अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे किंवा कसे व मुख्याध्यापकास बँकेत खाते उघडण्याची परवानगी दिली किंवा कसे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. म्हणजेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती पुरविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती पुरविली असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ११० इतके त्यांना परत करावे लागेल. तसेच अपिलार्थीस

त्यांच्या मूळ अर्जातील इतर मुद्दयासंदर्भात त्यांनी न दिलेली माहिती देखील पुरवावी लागेल हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व तसेच याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ११० इतके त्यांना परत करावे.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे संबंधित सर्व सहायक (जावक लिपिकासह) निःसंशयपणे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सर्व सहायक यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून, या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रुपये ११० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांनी उपरोक्त प्रकरणी

दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४८९

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, हिंगोली, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, हिंगोली यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली असता, माहिती अधिकारी यांनी अर्जदाराची दिशाभूल करुन माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०५-२००८ रोजी माहिती

अधिकारी यांच्या गैरहजेरीत प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन प्रकरण प्रलंबीत ठेवल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जून २००७ ते दि. ३१ जानेवारी २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारा पत्रव्यवहार झाला. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर झालेल्या निर्णयाची प्रत आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९०

निर्णय दिनांक   ०५-१०-२००९

१   श्री. मुदखेडकर महंमद एकबाल  महंमद युसूफ,   :   अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१   जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो विभाग), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२   जन अपिलीय अधिकारी   :   प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (जंकास), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक १२-०४-२००८ रोजी अर्ज पाठवून दिला असता माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २८-०४-२००८ रोजी पत्र पाठवून सदरील माहिती देण्याकरिता डबल शुल्क आकारल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले.  या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय दिल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्षे २००१ ते दि. ३१ मार्च २००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात काही माहिती माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २८-०४-२००८ रोजीचे पत्र व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिलेल्या आदेशाची प्रत जोडलेली नाही. तेव्हा अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही कागदपत्रे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडली नसल्याने, आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो विभाग), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९१

निर्णय दिनांक ०५-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, डॉ. एकबाल उर्दू मॉडेल हायस्कूल,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, अर्धापूर एज्युकेशन सोसायटी, अर्धापूर,
मार्फत डॉ. एकबाल उर्दू मॉडेल हायस्कूल, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. एकबाल उर्दू मॉडेल हायस्कूल, अर्धापूर यांच्याकडे दिनांक २२-१०-२००७ रोजी अर्ज पाठविला असता त्यांनी मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतरही माहिती देण्यास जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केली, त्यामुळे त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी तथा सचिव, अर्धापूर एज्युकेशन सोसायटी, अर्धापूर यांच्याकडे दिनांक

१७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, संबंधित प्रथम अपिलेट अधिकारी यांनी हा अपील अर्ज घेण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित शैक्षणिक वर्ष १९९७ ते २००७ या कालावधीतील काही माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सचिव, अर्धापूर एज्युकेशन सोसायटी, अर्धापूर यांच्याकडे दिनांक ०३-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे हा अपील अर्ज संस्थेच्या सचिवांनी दाखल करुन घेण्यास नकार दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगास असे आढळून आले की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपील संबंधित शिक्षण संस्थेच्या सचिवांकडे केले आहे. जे कोणत्याही आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाहीत. शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांची शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीमध्ये प्रथम अपील अर्जावरील सुनावणी हा एक महत्वाचा टप्पा आहे. या प्रकरणी नेमके या ठिकाणी चुकीच्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीने प्रथम अपील केले असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे व अपिलार्थीस असे सूचित

करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी माहितीसाठीचा परत नव्याने अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करुन तदनंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत नांदेड जिल्हा परिषदेचे संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करावे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. एकबाल उर्दू मॉडेल हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अर्धापूर एज्युकेशन सोसायटी, अर्धापूर, मार्फत डॉ. एकबाल उर्दू मॉडेल हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७५
निर्णय दिनांक: ०६-१०-२००९

१. श्री. किरण शंकरराव कांबळे, : अपिलार्थी
रा. तरोडा (बु.), जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद,शिक्षण विभाग,
नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा परिषद, प्राथमिक विभाग,
नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जिल्हा परिषद, नांदेड येथील शिक्षण विभागाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००८ या वर्षामध्ये नांदेड जिल्हा परिषदेमध्ये ३७३ शिक्षकांच्या चुकीच्या समायोजनाबाबत आमदार श्री. सुभाष साबणे यांनी तारांकित प्रश्न क्र. ८५६६३ द्वारे उपस्थित केलेल्या मुद्यावर शिक्षण विभागाने काय कार्यवाही केली व चुकीचे समायोजन असलेल्या शिक्षकांना काय न्याय देण्यात आला आणि जिल्हा परिषदेमधील संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही केली अथवा यासंदर्भात कोणते आदेश देण्यात आले, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोयासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या मुदतीत देणे भाग होते. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणता प्रतिसाद दिला, ते आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चितपणे कोणता निर्णय दिला, हे संबंधितांच्या आजच्या सुनावणीच्या वेळी असलेल्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाबरोबर त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज एवढीच कागदपत्रे जोडली आहेत. या अर्जासंदर्भात इतर कोणतीही पूरक कागदपत्रे आयोगाकडे सादर केलेली नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक : ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण शंकरराव कांबळे, द्वारा आर.सी. थोरात यांचे घर, वैभवनगर तरोडा(बु.), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७६
निर्णय दिनांकः ०६-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शेख मुनिर शेख नन्हे साहब,<br>रा. किनवट, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,गोकुंदा, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. ०६.०५.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून नांदेड जिल्हयातील ग्रामपंचायत गोकुंदा ता.किनवट येथील प्लॉट नं. ३२ च्या संदर्भात अपिलार्थीच्या मालकीहक्क प्रमाणपत्र देण्याविषयी केलेली कार्यवाही व प्लॉट नं. ३२ वर लावलेला एकूण कर किती ? अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी हा सन १९८८ ते २००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने  अपिलार्थीने अधिनियमातील  कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०७.२००८ रोजी  प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी कालावधी वाढवून दिला. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी  उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. र.वि.श्रीमंगले नावाचे ग्रामसेवक या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने त्यांना माहिती पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर अपिलार्थीस कोणती माहिती पुरविली असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांना यावर आयोगास कोणतेही समाधानकारक उत्तर देता आले नाही. मात्र त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेल्या भूखंडावर एकूण चार व्यक्तींची मालकी आहे परंतु तशी नोंद त्यांच्या नोंदवहीवर नाही,यावर आयोगाने अपिलार्थीस तुम्ही तसे का कळविले नाही, हे विचारले असता तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी या दोघांनाही आयोगाच्या प्रश्नांना उत्तर देता आले नाही. मात्र सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी श्री. रामटेके यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल किंवा अपिलार्थीस ती माहि जन माहिती अधिकारी देऊ शकत नसल्यास अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(८) प्रमाणे माहिती नाकारण्याचे कारण कळवून अपिलार्थीस तसे कळविण्याची जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी यांची होती. तथापि या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, प्रथम जन माहिती अधिकारी श्री.श्रीमंगले रमेश व नंतर बदलून आलेले श्री. रामटेके या दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती पुरविली नाही. या दोन्ही जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या बचावाची पुरेपूर संधी देऊनही त्यांना आपल्या, अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीचे कोणतेही समर्थन आयोगासमोर करता आले नाही. हे पाहता, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब या प्रकरणाशी संबंधित दोनही जन माहिती अधिकारी श्री. रामटेके व श्री.श्रीमंगले यांच्यावर अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

या शास्तीची विभागणी संबंधित दोनही जन माहिती अधिकारी श्री. रामटेके व श्री. श्रीमंगले यांच्यामध्ये समसमान करण्यात येत असून या शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये पुढील लेखाशीर्षाखाली माहे ------- पासून जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये करावी. **लेखाशीर्ष : "००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा,८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती. किनवट यांनी वरील दोनही जन माहिती अधिकारी या शास्तीची रक्कम त्यांच्या वेतनातून दरमहा नियमितपणे शासकीय कोषागारात पाच हप्त्यात करतील, याची दक्षता घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सध्याचे कार्यरत जन माहिती अधिकारी श्री. रामटेके यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन व सध्याचे दोनही जन माहिती अधिकारी श्री. रामटेके व श्री.श्रीमंगले यांच्यावर वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती. किनवट यांनी वरील दोनही जन माहिती अधिकारी वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे शास्तीची रक्कम त्यांच्या वेतनातून दरमहा नियमितपणे शासकीय कोषागारात पाच हप्त्यात करतील, याची दक्षता घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मुनिर शेख नन्हेसाहब, रा. इस्लामपुरा वार्ड क्र. १४ धनराज टॉकीज रोड, किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७७
निर्णय दिनांक: ०६-१०-२००९

१. श्री. सुर्यकांत जी. पटणे, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शहर अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
महानगरपालिका, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपअभियंता,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२४.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - १२ व्या वित्त आयोगाअंतर्गत दिनांक २७.०५.२००४ रोजीच्या वर्कऑर्डरद्वारे प्रभाग क्र. ४ हिंगोली मुख्य रस्ता ते लोखंडी पूलापर्यंतच्या रस्त्याचे

मजबुतीकरणाच्या कामाचे देयक अदा होण्याबाबत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या विनंतीअर्जावर केलेली कार्यवाही, सदरील कामाचे अंतीम देयक अद्याप का झाले नाही याचे संपूर्ण तपशीलवार कारण, मोजमापपुस्तिका व यासंदर्भातील संचिकेची सत्यप्रत- ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिका यांच्याकडे दि. २३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०८.२००८ व दि. ०९.०९.२००८ रोजी अशा दोनवेळा सुनावण्या ठेवल्या होत्या. तथापि त्यावेळी या सुनावण्या होऊ शकल्या नाहीत व परिणामी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी ज्या कामाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्या कामाचे ते स्वतः ठेकेदार असून या कामाच्या अंदाजपत्रकाची रक्कम एक लक्ष रु. इतकी आहे. काम पूर्ण होऊन दोन वर्षे इतका कालावधी व्यपगत होऊनही महानगरपालिकेने त्यांच्या कामाचे देयक अद्यापपावेतो अदा न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अपील अर्ज ज्या वेळी त्यांच्याकडे केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. ए. बी. कुलकर्णी नावाचे उपअभियंता जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांच्या कार्यालयाचे

स्थलांतर झाले असल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो देता आली नव्हती. तथापि आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीस - "अद्यापपावेतो कामाचे देयक अदा न करण्याचे कारण" - ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबतची कारणे अथवा त्यासंदर्भातील स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. हा मुद्दा वगळता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आजच्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील - "त्यांना देयक अदा करण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे " या मुद्यावरील माहिती वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस, सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २४.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. सबब आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. कुलकर्णी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली देय होणारी संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस, सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. कुलकर्णी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुर्यकांत जी. पटणे, संगिता प्रिंटर्स, विनायकनगर, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७८
निर्णय दिनांक: ०६-१०-२००९

१. श्री. अशोक विठ्ठलराव सुर्यवंशी, : अपिलार्थी
मु.होंडाळा, ता. मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
समाजकल्याण अधिकारी गट अ,
जिल्हा परिषद, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने व त्यांना पूर्ण माहिती अपेक्षित असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंग आणि दंडात्मक कार्यवाही आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. ०८.०५.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे - "जन माहिती अधिकारी यांनी सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये किती लोकांचे कल्याण केले, त्याची पूर्ण

कागदपत्रांसह माहिती, लातूर जिल्हयातील ग्रँटेड शाळेची, मतीमंद, मुकबधीर, अपंग व आश्रमशाळेची पूर्ण पत्त्यांसह माहिती, अपिलीय अधिकारी म्हणून प्राप्त झालेल्या अपिलांची संख्या, त्यांच्या झेरॉक्स प्रती व त्यावर दिलेल्या निर्णयाच्या प्रती, अपिलार्थीच्या प्रथम अपीलासंदर्भात पूर्ण माहिती व माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करुन केव्हा निर्णय कळविणार याची माहिती, वरील मुद्दा क्र. २ मधील शाळेत किती वेळा भेटी दिल्या याबाबत पुराव्यासह साक्षांकित माहिती, या सर्व शाळांतील नोंदीप्रमाणे विद्या व त्यांच्या सोईसुविधा पूर्ण करतात काय?" - या मुद्यांवरील माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती म्हणजेच लातूर जिल्हातील अनुदानित अपंगशाळांची पत्त्यासह यादी, अपिलार्थीस विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१९.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी दिनांक १८.०८.२००८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,४ व ५ च्या संदर्भातील माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित मुद्यावरील देय माहिती अपिलार्थीस अद्यापपर्यंत पुरविलेली नाही. अपिलार्थीस माहिती न पुरविण्याचे कोणतेही कारण ते आज रोजी आयोगास सांगू शकले नाहीत. त्यांनी पुढे असे स्पष्ट केले की, जिल्हा परिषदेकडून

अनुदान प्राप्त होणाऱ्या सर्व अपंग,आश्रम शाळा वगैरे शाळांच्या प्रकरणात समाजकल्याण अधिकारी यांची प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली जात असते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.२, ३ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. याच अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने, त्यांच्याकडे अपील केल्यानंतर माहिती अधिकाऱ्यावर ते केव्हा दंडनीय कारवाई करुन आपला निर्णय कळवणार, अशी भविष्यकाळातील माहिती मागविली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी मतीमंद, मूकबधीर, अपंग व आश्रमशाळांना सन २००५ ते ०८ या कालावधीमध्ये किती वेळा भेटी दिल्या, याची पुराव्यासह माहिती मागविली होती. ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे अपिलार्थीने - 'या शाळा नोंदीप्रमाणे विद्या व सोईसुविधा उपलब्ध करतात काय?' - अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे, जी अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. या मुद्याच्या अशाप्रकारच्या विसंगत स्वरुपामुळे या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे व अपिलार्थीस देय असलेल्या माहितीचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथःक्करण पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील फक्त मुद्दा क्र.२,३ व ५ च्या संदर्भातील माहिती देय होत आहे. त्यापैकी मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १२ दिवसांच्या विलंबाने पुरविली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.३ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो पुरविलेली नाही. हे पाहता संबंधित जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ व ५ च्या संदर्भातील संबंधित माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. या करिता या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एल.आय.वाघमारे (सध्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, यवतमाळ या पदावर कार्यरत) हे निःसंशयपणे जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी केलेल्या अशाप्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र असल्याचे सिध्द केले आहे. सबब सचिव ( सामाजिक न्याय), मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एल.आय.वाघमारे यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशाप्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी श्री. मनोहर नरसिंग कावळे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली मुद्दा क्र. ३ व ५ च्या संदर्भातील देय होणारी संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

कृ.मा.प...५

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एल.आय.वाघमारे (सध्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यवतमाळ या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक : ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक विठ्ठलराव सुर्यवंशी, रा. मु.होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७९
निर्णय दिनांकः ०६-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. कोल्हे दत्तात्रय आबाराव,<br>रा.हावरगाव, ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,<br>जिल्हा परिषद,उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असून, प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. तसेच आयोगाकडे या अर्जासोबत जोडलेल्या एका विनादिनांकाच्या अर्जामध्ये त्यांनी अशी तक्रार केली आहे की, हावरगाव ता.कळंब येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याची दुरुस्ती न करता बिल तयार केल्याचे जिल्हा परिषद कार्यालयास एक वर्षापूर्वी कळवूनही संबंधित कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी सर्व खोटी कागदपत्रे तयार केली व शेतक-यांची दिशाभूल करुन व खोटया सहया करुन यासंदर्भात संबंधित एजन्सीकडून पैसे घेऊन बील दिले. या तक्रार अर्जामध्ये अंतिमतः अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडून योग्य ती कार्यवाही अपेक्षिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'बंधारे दुरुस्ती न करता बील घेतल्याबाबत' या विषयावर जन माहिती अधिकारी यांनी बंधारा दुरुस्त न केल्यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीची पोचप्रत व तक्रारीवरील चौकशी अहवाल आणि लाभार्थी शेतक-यांची यादी - अशाप्रकारची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीस त्यांनी उल्लेख केलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या कामाच्यासंदर्भात पारदर्शी चौकशी करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीच्या तक्रारीवर जिल्हा परिषदेने नेमणूक केलेल्या दुसऱ्या कार्यकारी अभियंत्यामार्फत चौकशी झाली व या चौकशीमध्ये अपिलार्थीची तक्रार निरर्थक असल्याचे आढळले. याचवेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या संदर्भातील सर्व तक्रारीवर कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाच्या प्रती अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजी दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने द्वितीय अपील केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचा दिनांक पाहता, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी अपिलार्थीच्या तक्रारीवर त्यांच्या कार्यालयातर्फे चौकशी चालू होती. त्यामुळे त्यांना अपिलार्थीस पूर्ण चौकशीचे अहवाल उपलब्ध करुन देता आले नाहीत. तदनंतर अपिलार्थीच्या तक्रारीवर चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस चौकशी अहवाल पाठविला. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटत आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेली माहिती ही, नेमकी कोणत्या मुद्यावर त्यांना अर्धवट वाटते व प्राप्त माहितीने त्यांची कशाप्रकारे दिशाभूल होत आहे, याचे सुस्पष्ट विवेचन त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. तसेच आज रोजी सुनावणीसाठी त्यांचा मुद्दा मौखिक स्वरुपात स्पष्ट करण्यासाठी देखिल अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय आबाराव कोल्हे, मु.पो. हावरगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८१०
निर्णय दिनांक: ०६-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गंगाराम गंगाराम कवडेकर,<br>रा.कुंडलवाडी, ता.बिलोली, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, कुंडलवाडी,<br>ता.बिलोली, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.२३.११.२००६ रोजी नोंदविलेले व औरंगाबाद येथील कार्यालयाकडे दि. ०६.०९.२००८ रोजी फेरसादर झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०१.१९८६ ते १२.०१.१९८९ च्या पगारात भोळे आयोगाप्रमाणे झालेल्या वाढीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीस त्यांच्या वेतनातील भोळे आयोगाप्रमाणे त्यांना देय असलेल्या फरकाचे देयक जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले असल्यामुळे

अपिलार्थीने आयोगाकडील त्यांचे द्वितीय अपील मागे घेण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे व त्याप्रमाणे आयोगास दि. ०६.१०.२००९ रोजीचे त्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्र. २८१०/०७ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेली विनंती मान्य करण्यात येत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. २८१०/०७, दि.०६.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गंगाराम गंगाराम कवडेकर,बुरुडगल्ली, नांदेड वेस,रा.कुंडलवाडी, ता.बिलोली, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, कुंडलवाडी,ता.बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७०

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, : अपिलार्थी
शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड, तालुका बीड,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप संचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी — तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, बीड

जन अपिलीय अधिकारी — अधीक्षक, भूमी अभिलेख बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत दिली नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्याचा निकाल दिनांक ०५-०५-२००८ रोजी देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना

प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अंतीमतः अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व आयोगाने संबधित जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चुकीच्या कृतीबद्दल त्यांच्यावर नियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००९ रोजीच्या पत्राव्दारे (म्हणजेच आयोगाकडील सुनावणीच्या तीन दिवसापूर्वी) पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयाच्या जावक क्रमांक ३०८२ या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांच्या कार्यालयाच्या स्थानिक टपालवहीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. त्याचे अवलोकन करता या पत्राच्या स्थानिक टपाल नोंदवहीवर क्रमांक ४०१ व ४०२ अशी दोन ठिकाणी अपिलार्थीच्या नावाची नोंद असून ४०२ क्रमांक नंतर खोडून दुसरे नांव लिहिले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविल्यासंदर्भात दिनांक ०३-१०-२००९ ची अशी ही विसंगती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याबद्दल आयोग साशंक आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वसाधारणपणे सुसंगत माहिती दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आर. एम. बेग, अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, बीड) व या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून स्वतःला एकत्रितपणे अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईसाठी पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आर. एम. बेग, अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, बीड) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस

आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. आर. एम. बेग, अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, बीड) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कचरुलाल बस्तीमल जैन, शितल वस्त्र भांडार, जुना मोंढा, बीड, तालुका बीड, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. आर. एम. बेग, अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फतः अधीक्षक भूमी अभिलेख, बीड)(नोंदणीकृत टपालाद्वारे )

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७१

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

१ श्री. बाबुराव तुकारामआप्पा पटवे, : अपिलार्थी
मु. पो. जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ),
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, नगर परिषद कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्वे नंबर २६२ मधील ९७ क्रमांकाचा प्लॉट हस्तांतरीत केला असून सदरील प्लॉट पूर्व पश्चिम किती फूट आहे व उत्तर दक्षिण किती फूट आहे अशी

माहिती विचारली असून याप्रमाणे क्षेत्रफळ व चतु:सीमा दर्शवून त्याचबरोबर कबाल्याच्या प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कबाल्याच्या प्रती व्यतिरिक्त उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पाठवून दिली. तथापि कबाल्याची प्रत प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००८ रोजी निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणताही निर्णय दिलेला नाही. मात्र अपिलार्थीचे अपील नस्तीबंद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय प्राप्त होण्यापूर्वी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या निर्णयाच्या प्रतीबरोबर अपिलार्थीस कबाल्याची प्रत पुरविली असून आता संपूर्ण माहिती अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या आदेशाच्या प्रतीबरोबर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना अपेक्षित असलेल्या कबाल्याची प्रत पुरविली आहे हे त्यांचे म्हणणे सिध्द होत नाही. कारण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश जन माहिती अधिकारी यांना दिल्याचे

आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस कबाल्याची प्रत दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असल्याचे सिध्द होत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागणी केल्याप्रमाणे सर्वे नंबर २६२ मधील भूखंड क्रमांक ९७ च्या कबाल्याची प्रत प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस नगरपरिषद, परभणी क्षेत्रातील सर्वे नंबर २६२ मधील भूखंड क्रमांक ९७ च्या कबाल्याची प्रत हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील सर्वे नंबर २६२ मधील भूखंड क्रमांक ९७ च्या कबाल्याची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबुराव तुकारामआप्पा पटवे, मु. पो. जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७२

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी. सी. पाटील,<br>समता कॉलनी, कल्पेश किराणा स्टोअर्सच्या मागे,<br>उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद,<br>तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, दिलेली माहिती अपुरी व असंबंधित आहे म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून या अपील अर्जाव्दारे,जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अपेक्षित आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ग्रंथालय, प्रवास देयक, थकबाकी देयक, पोस्टाच्या आर. डी. बाबत, इत्यादी मुद्दयासंदर्भात सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण पाच मुद्दयांव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे, असा खुलासा विचारला. तथापि यावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ११-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचे सदर अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थीस सूचित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले किंवा कसे यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. मात्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००८ पर्यंत माहिती देण्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाला त्यांच्या दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राने कळविले असल्याचे दिसून येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी मुख्याध्यापकांना उद्देशून लिहिलेल्या या त्यांच्या दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन त्यांना मुख्याध्यापक यांचेकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस संबंधित मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये बहुतांश माहिती ही जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपाची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे मुद्देनिहाय अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील शिक्षणाधिकारी यांच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राने त्यांनी मुख्याध्यापकास मागितलेल्या खुलाशाची व बील कधी अदा केले जाईल ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित केला आहे. खुलासा अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे अर्जदारास, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. किंबहुना अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही असे म्हणणे या ठिकाणी जास्त श्रेयस्कर होईल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाच प्रकारची भविष्यकाळातील माहिती विचारली असल्याचे दिसून येत आहे. ती माहिती देखील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील शाळेतील कर्मचा-यांच्या बाबत सप्टेंबर २००५ मध्ये किती पूरग्रस्त निधी कपात केला, किती भरणा केला या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे आणि या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००६ पासून किती कर्मचा-यांना प्रवास देयके अदा केली याची माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे २००६ पासून थकीत प्रवास देयके तरतूद नसल्याने अदाई निरंक असल्याचे कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी मार्च २००६ पासून कोणत्याही प्रकारची प्रवास देयके अदा केली नाहीत असे दिसून येते.

वरील परिच्छेदातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता असे आढळून येते की, अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती- मुख्याध्यापकाने शिक्षणाधिकारी यांच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीवरील खुलाशाची प्रत - ही अपिलार्थीस पुरविल्याचे आढळून येत नाही. यासंदर्भात मुख्याध्यापकांनी असा खुलासा केला की, शिक्षणाधिका-यांच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्रावर त्यांनी अद्यापपर्यंत कोणताही खुलासा केलेला नाही. या प्रकरणातील अधिक माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्याकडे ग्रंथपाल या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला गेला होता. तथापि अतिरिक्त कार्यभाराचे एकूण वेतन रुपये १००० इतके त्यांना अदा केले गेले नाही. अपिलार्थीचे सदर प्रकरण आता कालबाह्य झाले असल्याने अपिलार्थीस त्यांनी अद्यापपावेतो त्यांच्या अतिरिक्त कार्यभाराचे वेतन अदा केले नाही. परंतु आता अपिलार्थीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडून आदेश प्राप्त करुन ते त्यांना देता येणे शक्य होईल. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून अपिलार्थीस त्यांच्या जादा कार्यभाराचे वेतन हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या कालावधीत अदा केले जाईल, असे पहावे.

वरील प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद पाहता, हा प्रतिसाद अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील कोणती माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे ती माहिती अपिलार्थीस देण्याऐवजी अपिलार्थीस कोणती माहिती अपेक्षित आहे त्याचा बोध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. त्यांच्या या पत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमत होताच तीस दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधीत मुख्याध्यापक, (श्री. भड अनिल कृष्णा) जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पी. सी. पाटील, समता कॉलनी, कल्पेश किराणा स्टोअर्सच्या मागे, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७३

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

१ श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, अपिलार्थी
व्दारा - शेळके साहेब यांचे रहाते घर, दत्तनगर,
(गोकुंदा), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. पी. एम. आडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०६-१०-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून याबाबतची त्यांची कोणतीही तक्रार नाही व आयोगाकडील विचाराधीन अपील क्रमांक १४७३/२००८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे आयोगाकडील त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १४७३/२००८, दिनांक ०९-०९-२००८ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १४७३/२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-१०-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाघमारे प्रकाश ग्यानोबा, व्दारा - शेळके साहेब यांचे रहाते घर दत्तनगर (गोकुंदा), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४७४

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

१ श्री. शंकर इंगळे, : अपिलार्थी
आनंदनगर चौक,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलार्थी सुनावणीस हजर नव्हते म्हणून त्यांचे अपील फेटाळून लावले आहे. अपिलार्थीची गैरहजेरी हे अपील नाकारण्याचे कारण होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोफत माहिती उपलब्ध करुन देण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्यावर

अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केंद्र पुरस्कृत कडधान्य, गळीत धान्य विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत मोफत वाटप केलेले फेरोमन सापळे, जैविक खते व कृषि सहायकाचा दौरा कार्यक्रम २००८ या माहितीच्या प्रमाणित प्रती व्यक्तिशः मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०२ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व शुल्काचा भरणा केल्यानंतर आवश्यक ती माहिती पुरविण्याचे आश्वासीत केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ते शुल्क रुपये २०२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्यामुळे ते ती माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयांव्दारे व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता, अर्ज केल्यानंतर या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये ते ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले यासंबंधी कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केलेला नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००८ रोजी म्हणजे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०२ हे आवश्यक त्या तपशीलासह कळविले आहे. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे जसे त्यांचे कर्तव्य आहे तसे जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरणे हे अर्जदाराचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी त्यांनी घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्पयवर कधीही दर्शविली नाही. व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते किती वेळा गेले याचा कोणताही सबळ पुरावा जोडलेला नाही. अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही

माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०२

निर्णय दिनांक ०६-१०-२००९

१ मिन्हाज अख्तर सय्यद सोहेल अहेमद, : अपिलार्थी
व्दारा काजी मेराज, बालेपीर मस्जिदसमोर, सोनपेठ,
तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी फेर नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मिन्हाज अख्तर सय्यद सोहेल अहेमद, सह शिक्षिका यांच्या बदलीसंदर्भात एकूण ११ मुद्दयाव्दारे काही माहिती रजिस्टार पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ही माहिती त्यांनी स्वतःच्या बदलीसंदर्भात मागितली होती, तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही त्यांना पुरविली नाही.

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या बदलीसंदर्भात डॉ. झाकिर हुसेन शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे एकूण ११ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २, ८ व ११ वगळता उर्वरित मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने उर्वरित मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे व पर्यायाने ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होत नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये

अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास पुरविण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५० याप्रमाणे त्यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ८ व ११ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा, परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक २, ८ व ११ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा, परभणी यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ मिन्हाज अख्तर सय्यद सोहेल अहेमद, व्दारा काजी मेराज, बालेपीर मस्जिदसमोर , सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. झाकिर हुसेन प्राथमिक शाळा, कादराबाद प्लॉट, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९२

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

१ श्री. कचरु रामभाऊ टकले, : अपिलार्थी
मु. पो. आंदोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, संत ज्ञानेश्वर महाराज निवासी
मुकबधीर विद्यालय, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती ही अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता समाजकल्याण अधिकारी यांनी आठ दिवसात माहिती देण्याचा निर्णय दिला. परंतु यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अंतीमतः अशी विनंती केली आहे की, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधितांवर दंडात्मक

कार्यवाही करावी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांच्यावरही दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व तसेच अपिलार्थीस ते दुर्बल व शेतमजूर असल्यामुळे त्यांचा या प्रकरणातील झालेला खर्च रुपये ५००० हा भरुन द्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी एकूण तीन मुद्दयाव्दारे सन १९९६-९७ ते २००४-०५ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेला मान्यता मिळाल्याचे वर्ष, सन १९९६-९७ या वर्षी शाळा चालू होती याची माहिती, सन १९९६-९७ साली शाळा चालू असल्यास नेमणूका केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी, या सर्वांची सन १९९६-९७ ते २००४-०५ या वर्षातील हजेरीपत्रकाची साक्षांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व ही माहिती त्यांच्या कार्यालयातून तात्काळ घेऊन जाण्याचे सूचित केले व नंतर दिनांक २२-०४-२००८ रोजी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाने माहिती मागितली असता ही माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सूचित केल्याचे कारण दर्शवून दिनांक २२-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि प्रत्यक्षतः ती सुनावणी झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, समाजकल्याण अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना लेखी स्वरुपात कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अशाच प्रकारचे त्यांचे अभिप्राय दिलेले आहेत,

हे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न घेतल्याचे येथे सिध्द होत आहे. अशा प्रकारे आवश्यक त्या माहितीपासून अपिलार्थीस वंचित ठेवल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधीर विद्यालय, कळंब हे विद्यालय त्यांनी बालाजी युवक मंडळ, नावंदी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडून हस्तांतरीत करुन घेतलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीपैकी सन १९९६-९७ ते २००४-०५ या कालावधीतील शिक्षकांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती अद्यापपावेतो त्यांना अपिलार्थीस पुरविता आल्या नाहीत. कारण या कालावधीतील संबंधित अभिलेखे बालाजी युवक मंडळ, नावंदी, तालुका उदगीर यांना त्यांनी दिनांक २२-०२-२००० रोजी न्यायालयाच्या कामकाजाकरिता पाठविले होते, तथापि या संस्थेने अद्यापपावेतो हे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांना परत केलेले नाहीत, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस या संदर्भातील माहिती देता आली नाही. बालाजी युवक मंडळ, नावंदी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर ही संस्था आता बंद पडलेल्या अवस्थेत आहे, असे त्यांना समजले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या हजेरीपत्रकाच्या सन १९९६-९७ ते २००४-०५ या कालावधीतील प्रती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविल्या गेल्या नाहीत. अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये

स्पष्ट केली आहेत. तथापि हे कारण आयोग अमान्य करत आहे. कारण संबंधित संस्थेला दिनांक २२-०२-२००० रोजी हस्तांतरीत केलेली ही अभिलेखे आजतागायत २००९ सालाच्या अखेरपर्यंत संबंधित संस्थेकडून त्यांना परत न करण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही. किंबहुना यामध्ये काही अभिलेखे संशयास्पद असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो अपिलार्थीस द्यावयाची राहिलेली माहिती त्यांनी बालाजी युवक मंडळ, नावंदी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांच्याकडून स्वत: प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी. जर बालाजी युवक मंडळ, नावंदी, तालुका उदगीर, जिल्हा लातूर ही संस्था त्यांना ही कागदपत्रे परत करत नसेल तर त्यांनी त्या संस्थेवर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करुन तसे अपिलार्थीस अवगत करावे. अपिलार्थीस उर्वरित मुद्दयांवरील माहिती दिली असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देण्याबाबत आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची सचिव (सामाजिक न्याय) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची व त्यांना या प्रकरणी झालेल्या आर्थिक नुकसान व खर्चापोटी रुपये ५००० इतकी नुकसानभरपाई देण्याची विनंती केली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे नि:संशयपणे सिध्द न झाल्याने व या प्रकरणी झालेल्या खर्चाचा तपशील अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेला नाही. तसेच यासंदर्भात इतर पूरक स्पष्टीकरण आयोगास देण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर अनुपस्थित असल्यामुळे अपिलार्थीचे हे सर्व मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहिती-तील उर्वरित माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कचरु रामभाऊ टकले, मु. पो. आंदोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधीर विद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९३

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

१ श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले, : अपिलार्थी
मु. पो. कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण)
विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) बांधकाम विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी दाखल केलेल्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीची बाजू न पाहता व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसाच्या आत माहिती न मिळाल्यामुळे त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य

माहिती प्राप्त व्हावयास हवी होती परंतु अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या विरोधात निकाल दिला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-०१-२००६ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व उपविभागांना दिलेल्या आकस्मिक खर्चापोटी झालेल्या खर्चाची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७२७२ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीकडून शुल्क भरुन घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७२७२ इतके चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्याची या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही तयारी दर्शविली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे काय ? या मुद्दयासमोर त्यांचे कोणतेही अभिप्राय दिले नाहीत. तसेच माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहारामध्ये देखील त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोठेही उल्लेख केलेला नाही. याचबरोबर, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे शुल्क भरावयाचे त्यांचे कर्तव्य अपिलार्थीने पार न पाडल्यामुळे त्यांना माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येत आहे.सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले, मु. पो. कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९४

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

१ श्री. सय्यद नविद कादरी गौस मोहीयोद्दीन, : अपिलार्थी
रा. ४१, जिल्हा परिषद कॉलनी, मालेगांव रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, इंग्रजी हायस्कूल, मदिना उलूम
हायस्कूल, बागवान गल्ली, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : सौ. यजदाना नूर कादरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांची पत्नी त्रयस्थ पक्ष सौ. यजदाना नूर कादरी या इंग्रजी हायस्कूल, मदिना तुल उलूम हायस्कूल, नांदेड येथून दिनांक ३१-०८-२००८ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांना सेवानिवृत्तीचे वेतन प्राप्त होण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी श्री. अथरअली यांना माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली असता, त्यांनी अपिलार्थीची दिशाभूल केली. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्या पत्नीच्या सेवानिवृत्तीसंदर्भात करावयाची कार्यवाही झाली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी हे

ही माहिती देण्यासाठी पैशाची मागणी करत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष सौ. यजदाना नूर कादरी यांनी त्यांच्या शाळेत कोणत्या वर्षापासून ते कोणत्या वर्षापर्यंत काम केले ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पत्र लिहून सदर माहिती संबंधितांना त्वरित उपलब्ध करुन द्यावी विलंब झाल्यास अपिलार्थीस व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल असा अपिलार्थीस इशारा दिला. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अग्रेषित करुन त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत पुरविली नाही. त्यानंतर अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी नेमका उलट निर्णय देऊन अपिलार्थीला स्वतःलाच माहिती देण्याचे सूचित केले. शिक्षणाधिकारी यासारख्या पदावर काम करत असलेल्या अधिका-याकडून अशा प्रकारची घोडचूक होणे याचाच अर्थ माहिती

अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करतांना त्यांची असलेली नकारात्मक मानसिकता त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे व्यक्त केली आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊन त्याची प्रत अपिलार्थीस देणे अपेक्षित असतांना त्यांनी त्याचा विपर्यास करुन आपल्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईचे पुरेपूर दर्शन घडविले आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद शिक्षण संचालकांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीची माहिती सेवानिवृत्तीवेतनासंदर्भात असल्याने या माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इंग्रजी हायस्कूल, मदिना उलूम हायस्कूल, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इंग्रजी हायस्कूल, मदिना उलूम हायस्कूल, नांदेड यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद नविद कादरी गौस मोहीयोद्दीन, रा. ४१, जिल्हा परिषद कॉलनी, मालेगांव रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इंग्रजी हायस्कूल, मदिना उलूम हायस्कूल, बागवान गल्ली, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड,पुणे रेल्वे स्टेशनजवळ पुणे-४११००१ यांना या निकाल पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९५

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

१ श्री. शिवकुमार शिवाचार्य महास्वामिजी, : अपिलार्थी
श्री. नीलकंठ - वीरभद्र महादेव मठ - मंदिर संस्थान
त्रिशूलनगर, त्रिशूल चौक, श्रीक्षेत्र माहूरगड,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी श्री. व्हि. वाय. बिराजदार हे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्याने व त्यांनी मागणी केलेल्या मूळ दस्तऐवजापैकी अनेक दस्तऐवज त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री नीळकंठेश्वर वीरभद्र महादेव मंदिर आणि त्याच्या परिसरातील विकास कार्यासंदर्भात एकूण ९ मुद्दयाव्दारे सन २००१ ते २००७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. (अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणत्या तारखेला माहिती पुरविली हे अपिलार्थीस आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगता आले नाही.) तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील ब-याचशा मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही. त्यांना अद्यापपावेतो कामाच्या प्रशासकीय मान्यतेची प्रत, अंदाजपत्रकाची नक्कल, तांत्रिक मान्यता प्रत, अंदाजपत्रकाची प्रमाणित प्रत व शासनास दिनांक २२-०२-२००६ रोजी पाठविलेल्या एकूण ३.२३ कोटी रुपयाच्या मंजुरीसाठीच्या अंदाजपत्रकाची प्रत व ग्रामीण विकास विभागाकडून आदेशित केलेला अहवाल ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही व अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचे देखील सिध्द होत आहे. हे सर्व पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस उर्वरित माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत त्यांच्या मूळ अर्जातील द्यावयाची उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपर्यंत त्यांच्या मूळ अर्जातील द्यावयाची राहीलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                            ( वि. बा. बोरगे )

दिनांक        ०७-१०-२००९                              राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१  श्री. शिवकुमार शिवाचार्य महास्वामिजी, श्री. नीलकंठ - वीरभद्र महादेव मठ - मंदिर संस्थान त्रिशूलनगर, त्रिशूल चौक, श्रीक्षेत्र माहूरगड, तालुका माहूर जिल्हा नांदेड.

२  जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३  जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४  मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९६

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विनोद गोपीनाथ कोरके,<br>कश्मीर नगर, कांचनवाडी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, सेंट जॉन इंग्रजी प्राथमिक शाळा,<br>ईटखेडा, पैठण रोड, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर केला असता त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित राहिले व माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन केले. त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनाशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला त्या अन्वये, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००५ ते २००८ या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील शिक्षक पालक संघाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००५ ते २००८ या शैक्षणिक वर्षात जन माहिती अधिकारी यांच्या शाळेत स्थापना झालेल्या शिक्षक पालक संघाची तपशीलवार माहिती, शिक्षक पालक यांच्या बैठकीमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ठरविण्यात आलेल्या शैक्षणिक शुल्काची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना सूचित केले तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या शाळेची माहिती मागितली आहे ती शाळा विना अनुदानित व इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. तसेच त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, विना अनुदानित शाळेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आकारण्यात येणाऱ्या फीच्या संबंधात शाळेच्या शिक्षक पालक संघाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येत असतात.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या दोन मुद्दयावरील माहितीपैकी 'शिक्षक पालक संघाचा तपशील' या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची माहिती मागितली नसल्याचे दिसून येत आहे. शिक्षक पालक संघाची तपशीलवार माहिती म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे हे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने या मुद्दयावर मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम होत आहे व मोघम स्वरुपाची माहिती अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहिती मागितली आहे त्या शाळेवर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचे नियंत्रण आहे. अद्यापपावेतो संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. या शाळेस शासनाचे कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील शैक्षणिक शुल्काच्या संदर्भातील मुद्दयावरील माहिती संबंधित शाळेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील शैक्षणिक शुल्काच्या संदर्भातील माहिती, संबंधित शाळेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विनोद गोपीनाथ कोरके, कश्मीर नगर, कांचनवाडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सेंट जॉन इंग्रजी प्राथमिक शाळा, ईटखेडा, पैठण रोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९७

निर्णय दिनांक ०७-१०-२००९

१ श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, : अपिलार्थी
मु. पो. समतानगर, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-

कडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपविभागीय कृषि अधिकारी, किनवट यांच्या दिनांक २३-०३-२००७ व दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी सन २००५ ते २००७ या कालावधीतील केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत उपविभागीय कृषि अधिकारी, किनवट यांच्या दिनांक २३-०३-२००७ व दिनांक २८-०५-२००७ च्या आदेशाच्या प्रतीही जोडल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी देखील या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका त्यांच्याकडे सापडत नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दिनांक २३-०३-२००७ व दिनांक २८-०५-२००७ या दोनही

पत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना उपविभागीय कृषि अधिका-याकडून प्राप्त झाल्या आहेत. एवढे असूनही आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित संचिका त्यांच्याकडे आढळून येत नाही असे आयोगास अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे आणि जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाशी संबंधित संचिका गहाळ झाली असेल तर ती संचिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर सोपविली होती, त्या कर्मचा-यावर जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक वाटल्यास फौजदारी कारवाई करुन त्या कार्यवाहीची एक प्रत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर (दिनांक १५-०५-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंत या पदावर कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर (दिनांक १५-०५-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंत या पदावर कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, मु. पो. समतानगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९८
निर्णय दिनांक: ०७-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. हनमंत गणेशराव पाटील किन्हाळकर,<br>रा.भोकर,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय,भोकर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. गणेशराव सटवाजी पाटील यांच्या दि. ०१.०४.२००५ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली व जर कार्यवाही केली नाही तर का केली नाही आणि सदर कार्यवाही करण्यासाठी कशाची पूर्तता करावयास हवी होती, यासंदर्भात सविस्तर माहिती - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला त्रयस्थ पक्षाचा अर्ज त्यांच्याकडे उपलब्ध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०८.०९.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाच्या दि. ०१.०४.२००५ रोजीच्या अर्जावर तत्कालीन प्रशासनाने काहीही कार्यवाही केली नाही, असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो पूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी जर कोणतीही कार्यवाही केली नव्हती तर कार्यवाही न करण्याची कारणे त्यांनी अपिलार्थीस कळविली नाहीत व तसेच त्यांच्या कामासाठी कशाची पूर्तता हवी, ही माहिती देखील त्यांनी अपिलार्थीस कळविली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या दि. ०१.०४.२००५ रोजीच्या अर्जावर तत्कालीन प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीस त्यांनी दि. ०८.०९.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. गणेशराव सटवाजी पाटील यांच्या दि.०१.०४.२००५ रोजीच्या अर्जावर केलेली कार्यवाही एवढीच माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसेल तर, का केली नाही याचे कारण अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या एखाद्या निर्णयाबाबत अथवा कृतीबाबत अर्जदारास कारणे अथवा स्पष्टीकरणे देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या अर्जावर का कार्यवाही केली नाही, याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित करता येणार नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या अर्जावर त्यांच्या अपेक्षप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी काय पूर्तता हवी आहे,अशाप्रकारची जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. ही माहिती देखील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०८.०९.२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती दि.०८.०९.२००८ रोजी प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता,या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जाच्या संदर्भातील

पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः संपर्क साधणे अपेक्षित आहे. यासंदर्भात आयोगाने अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा व्यक्तिशः संपर्क साधला होता व यासंदर्भातील काही पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध आहे काय, असे विचारले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. त्यामुळे आवश्यक त्या सबळ पुराव्या अभावी अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीचे अपील आता फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनमंत गणेशराव पाटील किन्हाळकर,पोलीस स्टेशनजवळ,भोकर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय,भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४९९
निर्णय दिनांकः ०७-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), जिल्हा परिषद,नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दि. ०८.०७.२००८ रोजी प्रथम अपिलेट अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले असता, प्रथम अपिलेट अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ होत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी. एन.सोनारे, आरेखक यांनी आयोगास अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले

दि. २६.०९.२००८ रोजीचे एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दि. २६.०९.२००८ रोजी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीने ते समाधानी आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे यावरुन दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

३) अपील क्र. १४९९/०८, दि.१६.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,द्वारा संजय सोपानराव गायकवाड रा.श्रध्दा निवास, लालवाडी,नांदेड ता.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५००
निर्णय दिनांकः ०७-१०-२००९

१. श्री. व्यंकट नारायण सुर्यवंशी, : अपिलार्थी
रा.नरसी,ता. नायगाव (खै.),जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २००६ च्या सभेच्या इतिवृत्ताची नक्कल, दि. १८.०३.२००५ रोजी घेण्यात आलेल्या जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या मासिक सभेतील विषय क्र.४ नुसार शासकीय अभियोक्ता यांनी दिलेल्या अभिप्राय पत्राची प्रत, अपिलार्थीच्या दि. २७.०२.२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०५.२००८ पर्यंत केलेली कार्यवाही व या अर्जासंदर्भातील टिपणीची झेरॉक्स प्रत,

सहायक संचालक (प्रशासन), समाजकल्याण संचालनालय,पुणे यांचे पत्र क्र. २४४७ व २४४८ दि. २७.०८.२००७ अन्वये पाठविलेल्या दोनही पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०५.२००८ पर्यंत केलेली कार्यवाही व या पत्राच्या प्रती, कार्यवाही केली नसल्यास का केली नाही, याबद्दल मुद्देसूद खुलासा, या प्रस्तावावर कार्यवाही करुन वेतनश्रेणी लागू करण्याचा अधिकार जन माहिती अधिकारी यांना असेल तर कोणत्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणार? जन माहिती अधिकारी यांना अधिकार नसेल तर कोणास आहे, याची माहिती, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय वसतीगृहातील वर्ग -४ चे रिक्त असलेले पदे भरण्याचे अधिकार आहेत का? व त्यातील शिपाई पदावर अपिलार्थी यांची नियुक्ती करता येते का? - या मुद्यांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०७.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ११.०८.२००८ पूर्वी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील दि. ०१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील संपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची प्रत व अपिलार्थीची पोच पावती आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की,

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी ज्या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे अपेक्षिले आहेत किंवा त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अपेक्षिली आहेत, त्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. मात्र उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण परिस्थितीत दि. २०.०४.२००८ पर्यंत देय होत आहे. या मुदतीत तर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०८.२००८ पूर्वी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करुनही यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता एक वर्ष, एक महिना आणि वीस दिवस इतका विलंब लावला आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब खचितच समर्थनीय नाही व याचप्रमाणे ही बाबही लक्षात घेतली पाहिजे की, अपिलार्थीस दि. २१.०५.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही किंवा या संपूर्ण कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही सकारात्मक प्रयत्न केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी श्री. दीपक आर.वडकुते (सध्या सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, पुणे या पदावर कार्यरत) हे अधिकारी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. त्यांनी त्यांच्या कृतीव्दारे अशाप्रकारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस सचिव, सामाजिक न्याय यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०१.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस समक्ष माहिती पुरविली आहे व याबाबत अपिलार्थीची पोचसही देखील घेतली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. दीपक आर. वडकुते (सध्या सचिव, विशेष जात पडताळणी समिती, पुणे या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. व्यंकट नारायण सुर्यवंशी, रा. मुखेड रोड, मस्जीदच्या बाजूला, नरसी, मु.पो.नरसी, ता. नायगाव (खै.), जि.नांदेड, पिन - ४३१७०९

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०१
निर्णय दिनांकः ०७-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बेंद्रे अरुण तातेराव व इतर<br>रा.सावरगाव (नसरत),<br>ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०९.२००८ रोजी फेर सादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवापुस्तिकेबाबत एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस एका आठवडयाचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी

यांना सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०३.१२.२००७ रोजी काही माहिती पुरविली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर परत जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर करुन आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांना कठोर शिक्षा देण्यात यावी आणि या प्रकरणी त्यांना सोसाव्या लागलेल्या आर्थिक नुकसानीबद्दल व मानसिक त्रासाबद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडून रु.१०,०००/- इतक्या नुकसान भरपाईची रक्कम देण्याचे आदेश पारित करावेत व त्यांनी मागणी केल्याप्रमाणे सर्व माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. ०३.१२.२००७ व तदनंतर दि. २४.०१.२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.१२.२००७ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती पुरवावी, याचे स्पष्ट निर्देश दिलेले असताना देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीने खुद्द जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती मागितली असतानादेखील अपिलार्थीस ती माहिती संबंधित मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले आहे. शिक्षण विभागामध्ये संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांची जरी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली

गेली असली तरी हे प्रकरण स्वत: शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांनीच उपलब्ध करुन द्यावयाची असते, या जन माहिती अधिकारी यांच्या कर्तव्याचा शिक्षणाधिकारी यांना या प्रकरणी विसर पडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती पुरविली नसल्याचे आढळून येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींना आयोगासमोर या प्रकरणासंदर्भात कोणताही खुलासा करता आलेला नाही. सबब अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २६.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आणि तसेच त्यांच्या दि. ०३.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे विसंगत स्वरुपाची माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव (शालेय शिक्षण) यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांना रु.१०,०००/- इतकी नुकसान भरपाई जन माहिती अधिकारी यांच्याकडून देवविण्याची केलेली विनंती आयोग आवश्यक त्या पुराव्याअभावी अमान्य करीत आहे.

प्रसंगावशात, सचिवांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, आयोगाकडे होणाऱ्या बऱ्याच सुनावणीच्या वेळी नांदेड, लातूर या जिल्हा परिषदेकडून सुनावणीसाठी जे अधिकारी/कर्मचारी पाठविले जातात त्यांना त्या प्रकरणाची यत्किंचितही माहिती नसते, असे आयोगास आढळून आले आहे. तेंव्हा अशाप्रकारच्या अकार्यक्षम अधिकारी/कर्मचाऱ्यांना आयोगाकडे इत:पर सुनावणीसाठी पाठवू नये, अशा अर्थाच्या सूचना त्यांनी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना द्याव्यात, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या मुद्दा क्र. ३,४ व ५ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.नांदेड यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बेंद्रे अरुण तातेराव व इतर रा.सावरगाव (नसरत), ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०२
निर्णय दिनांकः ०७-१०-२००९

१. श्री. जी. एस.रायबोळे, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यालय अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी,
विभागीय उपआयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांच्या मार्फत नांदेड जिल्हयातील देशी, विदेशी दारुची दुकाने शासनाच्या कोणत्या जी.आर.नुसार स्थलांतरीत केली, याची माहिती व नांदेड जिल्हयामध्ये देशी, विदेशी दारुची दुकाने चालविण्याची शासकीय परवाने दिलेल्या किती व्यक्ती प्रत्यक्षात स्वतः दुकाने चालवितात, राज्य उत्पादन शुल्क,

नांदेड विभागातून शासनाला प्रत्यक्षात मिळणाऱ्या अबकारी उत्पन्नाची माहिती, तसेच अधीक्षक, निरीक्षक, दुय्यम निरीक्षकांनी विहित नमुन्याचे तपासणी केलेल्या फॉर्मच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती सन २००० ते २००८ या कालावधीमधील मागितली होती. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिश: माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीचा दि. ०९.०४.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. १५.०४.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात जमा करण्याबाबत सूचित केले. तथापि या पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. ०४.०६.२००८ व दि.१०.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे याबाबत स्मरण दिले. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा न करता विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. परंतु या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित राहिले. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला अंतिम निर्णय पारित केला नाही. अपिलार्थीने यानंतर, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी उपस्थित न राहता, आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळवूनही अपिलार्थीने या शुल्काचा

भरणा त्यांच्याकडे केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ती माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास ते कधीही तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जामध्ये त्यांनी व्यक्तिशः माहिती अपेक्षित असल्याचे कळविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्या माहितीच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा, आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर सादर केलेला नाही. उलट जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. ०३.०५.२००८ रोजी व तदनंतर दि. ०४.०६.२००८ व १०.०७.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याकरिता विनंती केली आहे.परंतु जन माहिती अधिकारी यांच्या या विनंतीप्रमाणे अपिलार्थीने कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०६.२००८ रोजी अपील केले व या अपील अर्जाच्या सुनावणीसाठी देखील अपिलार्थी गैरहजर राहिले.

माहितीसाठीच्या आवश्यक शुल्काचा भरणा न करुनही, आज रोजी आयोगाकडील सुनावणीसाठी देखील अपिलार्थी गैरहजर आहेत. हे पाहता अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य नसावे, असाच निष्कर्ष, त्यांच्या या प्रकरणातील एकूण वर्तनावरुन काढण्यास हरकत नसावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे नमूद केले असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे, आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे करुन घ्यावी लागेल. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत

आहे. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी. एस.रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक 'धुमाकूळ', किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०३
निर्णय दिनांकः ०७-१०-२००९

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता.जि.जालना : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्षः १)श्री. आर.टी.मात्रे,
२)श्रीमती एस.एस.कुलकर्णी व
३)श्री. ठाकरे आर.एम.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२७.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. आर.टी. मात्रे, श्रीमती. एस.एस.कुलकर्णी, श्री. आर.एम.ठाकरे (सर्व सहशिक्षक म्हणून कार्यरत) यांना वेगवेगळया कालावधीमध्ये अदा केलेल्या वेतन देयकाची झेरॉक्सप्रत व कार्यालयीन कामाच्या विभागणीच्या कार्यालयीन आदेशाच्या झेरॉक्स

प्रती - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा दि. २७.०६.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. ०१.०७.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारताना त्यांनी अपिलार्थीने शाळेतील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका व रेकॉर्ड गहाळ केल्याबद्दल त्यांना सेवेतून बडतर्फ केले असल्याने आणि ते प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी निर्णय देऊन सुनावणीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०९.२००८ पर्यंत माहिती देण्याचे मान्य केल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना दि. ११.०९.२००८ रोजी प्राप्त झाली. परंतु प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष श्रीमती एस. एस. कुलकर्णी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती त्यांना अपूर्ण का वाटते, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील कार्यालयीन कामकाजाच्या विभागणीच्या आदेशाच्या प्रतींचा समावेश नसल्यामुळे, ही माहिती त्यांना अपूर्ण असल्याचे वाटते, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या विभागणीच्या आदेशाच्या प्रती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी, त्यांच्या कार्यालयातील कामकाजाच्या विभागणीच्या आदेशाच्या प्रती पुरविलेल्या नाहीत. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीनुसार प्रत्येक भारतीय नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क आहे. ही माहिती प्राप्त करुन घेत असताना संबंधित अर्जदारावर न्यायालयीन खटला चालू आहे, या एकमेव कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारणे, हे योग्य नाही. माहिती देण्याचा निर्णय घेताना अर्जदाराच्या चारित्र्यावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या म कृ.मा.प.४...
कार्यालयीन कामकाजाच्या विभागणीच्या आदेशा
निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, द्वारा-श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स, कचेरी रोड, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता.जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०८

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. नारायणसिंह धनिरामसिंह होलीये राजपूत, : अपिलार्थी
घर नं. ४-८-७७, श्री गंगाधन, हनुमान मंदिर, नवाबपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवापटाची दुय्यम प्रत मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर

जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०८-२००८ रोजी निर्णय देऊन कर्मचा-यांच्या सेवा निवृत्तीनंतर सेवापुस्तक जतन करुन ठेवण्याचा कालावधी पाच वर्षे निश्चित केला असल्याचे सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या निदर्शनास आणून अपिलार्थीस त्यांच्या सेवापटाची दुय्यम प्रत देता येत नाही असे त्यांच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर १५ दिवसा-पूर्वीच रुजू झाले असून अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज केला होता त्यावेळी श्री. दिवेकर नावाचे कृषि उपसंचालक हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. आयोगाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या सेवापुस्तकाची प्रत नव्याने बांधणी करुन ती अपिलार्थीस पुरविण्याचे त्यांनी आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. परंतु अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मूळात अधिनियमातील या कलमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी झालेल्या सुनावणीत अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणले आहे की, कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवापुस्तक जतन करुन ठेवण्यासाठीचा कालावधी पाच वर्षे इतका निश्चित केला गेला असल्यामुळे त्यांना

सेवापुस्तकाची प्रत देय होत नाही. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, जर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सेवापुस्तकाची प्रत ही जतन करुन ठेवण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर नष्ट केली असेल तर ती नष्ट केल्याचा पुरावा अपिलार्थीस द्यावा किंवा अपिलार्थीच्या सेवापुस्तकाची नव्याने बांधणी करुन त्याप्रमाणे ते अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद श्री. दिवेकर यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (कृषि) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या सेवापुस्तकाची प्रत, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. दिवेकर, कृषि उपसंचालक)

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायणसिंह धनिरामसिंह होलीये राजपूत, घर नं. ४-८-७७, श्री गंगाधन, हनुमान मंदिर, नवाबपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०९

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. नारायण साहेबराव तुपे / श्रीमती शोभाबाई पंढरीनाथ तुपे, : अपिलार्थी
मु. पो. बाभुळगांव खुर्द, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत मौजे बाभुळगांव खुर्द येथील जुन्या समितीने केलेल्या कामाचे मुल्यांकन अहवाल व त्यांनी प्रत्यक्ष कामावर केलेला खर्च व शिल्लक यांचा हिशोब याची माहिती मागितली होती. तथापि या प्रकरणी

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली नसल्याने अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या योजनेविषयी माहिती मागितली आहे ती योजना लोकवर्गणी व शासनाचे सहाय्य याव्दारे पार पाडावयाची अशा स्वरुपाची आहे. त्यामध्ये पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे ग्राम समितीमार्फत बांधकाम व नियंत्रण केले जाते. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित स्थानिक ग्रामस्थांच्या समितीकडेच उपलब्ध असते. या समितीवर, ग्रामस्थांमधून अध्यक्ष व सचिव यांची निवड केली जात असते. या व्यक्ति खाजगी असून त्यांची जन माहिती अधिकारी म्हणून अधिनियमातील तरतुदीनुसार नेमणूक केली गेलेली नाही. अपिलार्थीस कथित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या आदेशामध्ये अपिलार्थीस ग्रामपंचायतीकडून रेकॉर्ड उपलब्ध होताच १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००९ रोजी संबंधितांनी आवश्यक ती माहिती दिली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना सदर माहिती प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीस संबंधितांकडून पुरविण्यात आलेली माहिती ही त्यांनी मूळ मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या योजनेच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांच्याकडून माहिती मागितली आहे त्या योजनेचे संपूर्ण व्यवस्थापन पूर्णतः खाजगी व्यक्तींमार्फत केले जात असल्यामुळे प्रत्यक्षात शासनाचा निधी या योजनेमध्ये गुंतवला जात असूनही जनतेस माहिती प्राप्त होऊ शकत नाही अशी परिस्थिती येथे उद्‌भवत आहे. राज्य माहिती आयोगाकडे अशा प्रकारच्या योजनेबाबत अनेक अपिले दाखल होत आहेत हे लक्षात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकारच्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व योजनांच्या संदर्भात माहिती जतन करुन ठेवण्याचे काम जिल्हा परिषदेच्या एखाद्या अधिका-याकडे ठेवावे जेणेकरुन त्यांचा अशा प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता आणण्यास हातभार लागेल. ही सूचना मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क ) (चार) अन्वये देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील, विशेषतः त्यांना आवश्यक ती माहिती कार्यकारी अभियंत्याकडून प्राप्त झाली असल्याने, खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण साहेबराव तुपे / श्रीमती शोभाबाई पंढरीनाथ तुपे, मु. पो. बाभुळगांव खुर्द, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१०

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री, : अपिलार्थी
व्दारा- प्रिंट -एन- कोट, बी-१०, एम. आय. डी. सी.
चिकलठाणा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद : प्रतिवादी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिक्षेची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील एन-१ सिडको या भागात प्रवेश मार्गावर महानगरपालिकेने कोणत्या कायद्यान्वये लोखंडी खांब रोवले आहेत त्या कायद्याची झेरॉक्स प्रत, अशा प्रकारचे खांब उभे करतांना काही विनिर्देश निश्‍चित केले असल्यास त्या विनिर्देशाची प्रत, दोन खांबामधील अंतर, खांबांचे मुख्य रस्त्यापासून अंतर,त्या खांबावर बसविण्यात येत असलेले परावर्तक, आणि येथील होणा-या नुकसानीस कोण जबाबदार आहेत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम उत्तर देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस दिलेल्या या पत्रावरुन महानगरपालिकेला विवक्षित प्रकारच्या रहदारी-साठी सार्वजनिक रस्त्यांचा उपयोग करण्यास मनाई करण्याचा अधिकार असलेल्या त्यांच्याकडील मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायदा १९५० मधील कलम २०८ ची प्रत व त्यांना हे खांब उभारण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचे दिलेले नाहरकत प्रमाणपत्र याची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला असून त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात कोणतेही भाष्य आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला आहे की, रहदारी नियंत्रित करण्यासाठी अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयावरील लोखंडी खांब उभे करत असतांना ते कशा प्रकारे उभे करावे याची कोणतीही मार्गदर्शक तत्वे अथवा विनिर्देश त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ चे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या गाड्यांना होणा-या नुकसानीस जबाबदार कोण अशा प्रकारची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दलची कारणे विचारणे व त्यांनी अर्जदाराच्या प्रश्नांना उत्तरे देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहितीसाठीच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती, ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही आदेशित करण्यात येत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात अद्यापही

जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही शंकांचे निरसन करुन घ्यावयाचे असेल तर त्यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणाशी संबंधित नस्त्यांच्या तपासणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्याने अर्ज करावा आणि नस्त्यांची तपासणी करावी असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री, व्दारा- प्रिंट -एन- कोट, बी-१०, एम. आय. डी. सी. चिकलठाणा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५११

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. अच्युत अनंतराव जोशी, : अपिलार्थी
प्लॉट नं. २१, गुरुकृपा हौसिंग सोसायटी, चाणक्यपुरी
समोर, शहानूरवाडी, औरंगाबाद - ४३१ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपिलावर प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद परिमंडळातील विद्युत पुरवठ्यासंदर्भात दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या स्थितीसंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - डी. टी. सी. क्रमांक, गावाचे नांव, तालुका, जिल्हा, या डी. टी. सी. वरील रोहित्राची क्षमता, या रोहित्रावर जोडलेला भार (H.P./K.W.), डी. टी. सी. वरील फिडर्सची संख्या, या डी. टी. सी. च्या फिडर्स वरील शेवटच्या ग्राहकास मिळणारे व्होल्टेज, वेळ व दिनांकासह, प्रत्येक डी. टी. वरील पीक लोड काळात घेण्यात आलेल्या तीन नोंदी - वेळ, दिनांक व्होल्टेजसह - या मुद्दयांचा समावेश होता.

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार स्वरुपात माहिती उपलब्ध नसल्यामुळे आणि ही माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्याशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडून मागवून घेतली व त्याची प्रत अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अग्रेषित केली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्याकडील एकूण ३३,००० रोहित्रांशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार स्वरुपात उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित चार कार्यकारी अभियंता यांच्यावर अवलंबून

राहावे लागते. अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण चार जिल्ह्याच्या माहितीपैकी त्यांनी औरंगाबाद जिल्ह्याची माहिती अपिलार्थीस दिनांक २२-०८, २८-०८, ०६-०९ व १३-१०-२००८ या दिनांकास पुरविली आहे. अद्यापपावेतो त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जालना, परभणी व हिंगोली या जिल्ह्याची माहिती अपिलार्थीस देणे बाकी आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे आयोगास असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ६ व ७ मध्ये दिनांक ३१-०५-२००८ रोजी या फिडर्सवरील शेवटच्या ग्राहकास मिळणारे व्होल्टेज व पिकलोड काळात झालेल्या नोंदीसंदर्भात माहिती त्यांच्याकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी मागितली आहे. फिडर्सवरील ग्राहकांच्या व्होल्टेजच्या नोंदी त्यांच्याकडे तयार स्वरुपात उपलब्ध नव्हत्या. व्होल्टेज किती दाबाचे होते हे विद्युत दाब मिटर वरुनच मोजता येते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची नोंद त्यांच्याकडे ठेवण्याची पध्दत प्रचलीत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ शी संबंधित माहिती पुरविता येणार नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्याकडे तयार स्वरुपात उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्याशी संबंधित यंत्रणेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागणार होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती जन माहिती अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तीस दिवसांचा कालावधी अपुरा होता असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो. कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी डी. टी. सी. च्या फिडर्स वरील शेवटच्या ग्राहकास मिळणारे व्होल्टेज अशा प्रकारची माहिती मागितली होती, जी माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात

जतन करुन ठेवली जात नाही. तसेच एखाद्या ठिकाणचा विद्युतदाब मोजत असतांना त्या ठिकाणी मीटरव्दारे तो विद्युतदाब मोजता येतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही नव्याने तयार करुन जन माहिती अधिकारी यांनी पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. याही उपर अपिलार्थीने दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या विद्युत दाबाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागितली आहे. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ही स्थायी स्वरुपाची माहिती नसून ती क्षणाक्षणाला मागणी व पुरवठ्यानुसार बदलत असणा-या स्वरुपात आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप स्थायी नाही. त्यांनी मागणी केलेल्या विद्युतदाबाच्या नोंदी संदर्भातील माहितीची नोंद करुन ठेवण्याची पध्दत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये प्रचलितही नाही. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही मूर्त स्वरुपात उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कार्यान्वित फीडर्सची एखाद्या विशिष्ट ठिकाणाच्या पाहणी करुन त्या ठिकाणाच्या विद्युत दाबाची माहिती हवी असल्यास अधिनियमातील कलम २ (ज्ञ) (एक) अन्वये त्यांनी तशी मागणी माहितीच्या अधिकारांतर्गत स्वतंत्र अर्ज सादर करुन करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आता उर्वरित ५ मुद्दयांशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ शी संबंधित उर्वरित संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०८-१०-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अच्युत अनंतराव जोशी, प्लॉट नं. २१, गुरुकृपा हौसिंग सोसायटी, चाणक्यपुरी समोर, शहानूरवाडी, औरंगाबाद - ४३१ ००५.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१२

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. विठ्ठल बापुराव मुंढे, : अपिलार्थी
रा. नागझरी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागझरी,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे नागझरी येथील शेत सर्वे नंबर ११२ गट नंबर ६७ मधील मालकीच्या शेतजमिनीवर केलेल्या अतिक्रमणधारकाची नोंद कोणत्या आधारे घेण्यात आली व ती घेणा-या अधिका-याचे नांव, या मिळकतीची घरपट्टी व नमुना नंबर ८ व ९ मधील नोंद कोणत्या आधारे घेण्यात आली ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः प्रतिसाद दिला किंवा कसे, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आणि संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व  विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. विठ्ठल बापुराव मुंढे, रा. नागझरी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागझरी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१३

निर्णय दिनांक ०८-१०-२००९

१ श्री. शंकर इंगळे, : अपिलार्थी
आनंदनगर चौक, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने माहिती नाकारल्याने त्यांच्या-वर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य पुरवावी तसेच अधिनियमातील कलम १९ (८) नुसार ३०० रुपये इतका खर्च द्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने राज्य माहिती आयोगासमोर दिनांक ०६-०१-२००७ व दिनांक २४-०१-२००७ रोजी झालेल्या सुनावणीसाठी केलेल्या प्रवास बिलाच्या प्रती व संबंधितास रक्कम मिळाल्याच्या पोच पावत्या, बील मंजूर करणा-या अधिका-याचे नाव व हुद्दा, सुनावणीस बोलाविले नसल्यास अधिका-यास प्रवासाचा खर्च शासनाच्या तिजोरीतून देणे कसे समर्थनीय ठरते, दिनांक १७-०२-२००७ रोजी एक वाजेपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास कुलूप होते त्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत, पत्राप्रमाणे कारवाई करण्यात आलेल्या कर्मचा-यांची नांवे व केलेली कारवाई, दिनांक १४-१२-२००७ रोजी ११ वाजेपर्यंत गैरहजर असणा-या कर्मचा-यांची नांवे व हुद्दा, त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी वरिष्ठांनी पाठविलेल्या पत्राची प्रत, त्यांच्याकडून वसूल केलेली रक्कम व सेवापुस्तकात घेतलेली नोंद आणि दिनांक १७-०२-२००७ व १४-१२-२००७ रोजीच्या या दोनही प्रकरणी वरिष्ठांना पाठविलेल्या अनुपालन अहवालाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रमाणित स्वरुपात व व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८ इतके भरण्याचे व जर ही माहिती अपिलार्थीस पोस्टाने हवी असेल तर या शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त पोस्टाचा खर्च रुपये २५ इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना ती माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामधील अपिलार्थीच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या पत्राच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाने खुलासा विचारला असता त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस कळविले होते. परंतु अपिलार्थीने पैसे न भरता माहिती पाहण्याचा आग्रह धरला व पैसे न भरता त्यांच्या कार्यालयातून निघून गेले व नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील व आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांनी जर 'व्यक्तिशः'

अपेक्षित केली असेल तर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर केल्यापासून या अर्जाच्या संबंधात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिश: संपर्क साधणे गरजेचे आहे. यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी दिनांक १३-०५-२००८ रोजी संपर्क साधल्याचे दिसून येते. तथापि यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना ते पैसे भरण्यासाठी तयार आहेत. असे तोंडी सांगितले व माहितीची तपासणी करण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सांगितले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहितीची तपासणी करण्याचे अधिकार आहेत. तथापि त्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करुन त्या माहितीच्या तपासणीसाठी विनंती करणे गरजेचे होते. परंतु अपिलार्थीने अशा प्रकारचा कोणताही अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता फक्त तोंडी माहिती दाखविण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीची ही विनंती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दाखविली नसल्याचा आक्षेप घेतला आहे. या प्रकरणात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदारास विनामूल्य माहिती दाखविण्याची अशी पध्दत नाही. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती पाहावयाची होती तर त्यांनी त्याप्रमाणे तसा स्वतंत्र अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करणे गरजेचे होते. परंतु शुल्क न भरता विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पाहण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कृतीबाबत घेतलेले कोणतेही आक्षेप या प्रकरणी सिध्द होत नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय हा त्यांचा अर्धन्यायिक स्वरुपाचा निर्णय आहे. अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर

टाळल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग पारीत करत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी झालेल्या खर्चाची ३०० रुपये नुकसानभरपाई आयोगाकडे मागितली आहे. तथापि यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी दाखल न केल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वत:च जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१४
निर्णय दिनांक: ०८-१०-२००९

१. श्री. सायलू गंगाराम बुच्छलवार, : अपिलार्थी
रा.सगरोळी, ता.बिलोली, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक (संशोधन),
अनु.जमाती पडताळणी समिती,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहआयुक्त तथा
उपाध्यक्ष, अनु.जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक (सं), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दि. १७.०४.२००८ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे त्यांच्या कार्यालयाशी

संबंधित मार्च २००१ ते मार्च २००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते स्वतः दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे गट विकास अधिकारी यांनी दि. ०१.०३.२००८ रोजी पारित केलेले एक प्रमाणपत्र जोडले होते. तथापि या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत प्रमाणित केली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या दि.१७.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या दारिद्र्यरेषेचे मूळ प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. याबाबत अपिलार्थीच्या दि. १७.०४.२००८ रोजी प्राप्त झालेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी याचा त्यांना बोध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले होते. तथापि यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत जन माहिती अधिकाऱ्यास सादर न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ३०.१२.२००८, ०६.०३.२००९ व १७.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले व परिणामी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश पारित केले गेले नाहीत. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा सादर केला नाही. अपिलार्थीकडून सबळ पुरावा उपलब्ध न होऊन देखील त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०६.२००८ व १४.०९.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील माहिती आता बरोबर आणली असून ते ही माहिती

अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तीन वेळा सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी यापैकी एकाही सुनावणीस हजर राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला त्यावेळी, त्या अर्जासोबत ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही वैध पुरावा त्यांनी जोडला नव्हता. अपिलार्थीच्या ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे विचारणा केल्यानंतर, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे मूळ प्रमाणपत्र सादर केले नाही. या बाबीची येथे विशेषत्त्वाने नोंद घेण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या गट विकास अधिकारी यांच्याकडून पारित केल्या गेलेल्या प्रमाणपत्राच्या प्रतीवर त्यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेले दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र कोणीही प्रमाणीत केलेले नाही. त्यामुळे या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेला माहितीसाठीचा मूळ अर्जच अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणतीही माहिती देय होत नाही. तथापि असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजपर्यंत दि. १७.६.२००८ रोजी व दि.१४.०९.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे व यातील उर्वरित माहिती त्यांनी आज रोजी आयोगासमोरील सुनावणीच्या वेळी सोबत आणली आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, आता त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती, ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याची खात्री करुन घेऊन नंतरच ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

येथे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राबाबत वैध व सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतरच त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकेल.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीकडून त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्राबाबत, त्यांना वैध व सबळ पुरावा प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सायलू गंगाराम बुच्छलवार, रा.मु.पो. सगरोळी, ता.बिलोली, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१५
निर्णय दिनांक: ०८-१०-२००९

१. श्री. माधव शंकरराव भिसे, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद,लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखापाल, नगर परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत त्यांचा सद्‌हेतू असल्यासंदर्भात कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे विलंबाबाबत त्यांच्यावर कार्यवाही व्हावी.या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे लातूर शहरातील रिंगरोड ते शनिदेव मंदिर ते आबासाहेब पाटील यांच्या घरापर्यंत सिमेंट नाली व रस्ता करणे या कामांचे व्हाउचर्स (बील अदा केलेले व्हाउचरची सत्यप्रत)

च्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०७.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि.०३.०७.२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले व तदनंतर दि.२३.०७.२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर असून त्यांनी दि. २८.०९.२००९ रोजीच्या निवेदनाद्वारे त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २३.०७.२००८ रोजी म्हणजेच विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे व त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेली बिले अदा केलेल्या व्हाऊचर्सच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही पुरविल्या नाहीत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्याबद्दल त्यांच्यावर दंड व्हावा व अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या व्हाऊचर्सच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्याचे आयोगाने आदेश पारित करावेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०७.२००८ रोजीचा प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, न्यायालयाच्या ताब्यात असल्यामुळे ती अपिलार्थीस देता येत नसल्याचे अपिलार्थीस प्रथमतः कळविले व तदनंतर अपिलार्थीस दि. २३.०७.२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेल्या व्हाऊचर्सच्या प्रती उपलब्ध नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणती माहिती पुरविली याची, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे पडताळणी करता येणे शक्य नाही.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी न्यायालयाकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीचा अर्ज न्यायालयाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने टाळले किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली आहे, त्या माहितीच्या प्रती अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये समाविष्ट नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जात त्यांनी विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे कोणतेही आदेश आयोग पारित करीत नाही.

तथापि मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी या प्रकरणाची चौकशी करुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या बिलांच्या प्रती जन माहिती अधिकारी त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांनी या प्रकरणाची चौकशी करुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या बिलांच्या प्रती जन माहिती अधिकारी त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत देतील, असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव शंकरराव भिसे, रा.नगर परिषद क्वार्टर, अशोक हॉटेलसमोर, मेन रोड, लातूर, ता.जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१६
निर्णय दिनांकः ०८-१०-२००९

१. श्री. माधव शंकरराव भिसे, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद,लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लेखापाल, नगर परिषद, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. शिवणे एस.के.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे कोणताही सद्हेतूदर्शक पुरावा सादर न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.०४.२००८ रोजी प्राप्त झाला, त्यान्वये त्रयस्थ पक्ष श्री. एस.के. शिवणे

यांच्या इंधनभत्त्यासंदर्भात एकूण ८ मुद्याद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस दि.०४.०८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीस, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील करण्यापूर्वीच दि. ०६.०६.२००८ रोजीच्या पत्रामध्ये देखील हीच माहिती पुरविली होती. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद त्यांच्या दि.२८.०९.२००९ रोजीच्या निवेदनाद्वारे आयोगास सादर केला आहे. या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.२४.०७.२००८ रोजीच्या आदेशात जन माहिती अधिकारी यांना सात दिवसांचे आत म्हणजे दिनांक ३१.०७.२००८ रोजी माहिती देण्याचे सूचित केले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०८.२००८ रोजी माहिती पुरविली, म्हणजेच त्यांना विलंबाने माहिती पुरविली. तसेच त्यांनी दि. ०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागितली असता, ही माहिती देण्याचा अधिनियमाद्वारे निश्चित केलेला कालावधी दि. ०९.०५.२००८ रोजी संपुष्टात येऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. या सर्व बाबींवरुन जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे दिलेल्या मुदतीमध्ये माहिती पुरविली नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी प्रथमत: दि. ०६.०६.२००८ रोजी व तदनंतर दि. ०४.०८.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीच्या दि. ११.०४.२००८ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जास त्यांनी दि. ०६.०५.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे भरण्याचे सूचित करुनही अपिलार्थीने शुल्क भरले नाही. तरीही त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा विनामूल्य माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांच्या दि. ०९.०४.२००८ रोजीच्या अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. या मुद्यावर आयोगास असे आढळून येते की, अपिलार्थीचा दि. ०९.०४.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ११.०४.२००८ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केल्यानंतर तसेच हा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०७.२००८ रोजी दिला असून या निर्णयामधील 'दिनांक' या रकान्यामध्ये "२४.०६.२००८" अशी तारीख नमूद केली आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांचे निरीक्षण करता, हा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

२४.०७.२००८ रोजी दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादातील त्यांचे दोन मुद्दे सिध्द होत नाहीत व याउपर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले दि. ०६.०५.२००८ रोजीच्या प्रथम प्रतिसादाचे पत्र जोडले नाही. या सर्व प्रकारावरुन केवळ जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे आदेश आयोगाने निर्गमित करावेत, म्हणूनच अपिलार्थीने त्यांचे द्वितीय अपील अपूर्ण कागदपत्रांसह सादर करण्याचा खटाटोप केल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, विनामूल्य माहिती पुरवली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही टप्प्यावर असद्-हेतुने टाळले नाही. हे पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

तसेच अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, ती, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव शंकरराव भिसे, नगर परिषद क्वार्टर्स, अशोक हॉटेलसमोर, मेन रोड, लातूर, ता.जि. लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील

नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१७
निर्णय दिनांकः ०८-१०-२००९

१. श्री. चामे अंकुश रामचंद्र, : अपिलार्थी
रा.चिखली,ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,श्री.संत ज्ञानेश्वर निवासी मतिमंद विद्यालय,अहमदपूर,जि.लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी, गट-अ,
जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २५.०६.२००८ रोजी माहिती झाली असून ही माहिती अपुरी व प्रमाणित न केलेली अशी आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेश देऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांच्यावर दंड ठोठावण्यात यावा यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित एकूण १२ मुद्यांद्वारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागवून शाळेच्या प्रोसिडींग बुक, नोटीस रजिस्टर, किर्दबुक, आवक - जावक रजिस्टर, लेजरबुक, अभिप्राय पुस्तिका इत्यादी कागदपत्रे समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्यासमोर

तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.०४.२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०६.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी दि. २३.०६.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविल्याचे आयोगास अवगत केले व त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली. अपिलार्थीने त्यांच्याकडील अभिलेखे तपासणीबाबत केलेल्या विनंती संबंधात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांच्या ज्या अभिलेख्यांची तपासणी करावयाची होती, ते सर्व अभिलेखे, ते समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी घेऊन गेले होते, तथापि अपिलार्थी हे त्यावेळी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीस या अभिलेख्यांची तपासणी करता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व प्रमाणीत न केलेली माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस नेमक्या कोणत्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही याचा खुलासा त्यांनी या अपील अर्जामध्ये केलेला नाही व या संदर्भात त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडण्यासाठी ते आज

रोजी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रमाणीत स्वरुपात माहिती मागितली नव्हती. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणीत स्वरुपात माहिती देणे मूळात अपेक्षित नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रमाणीत स्वरुपात माहिती अपेक्षित करता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी आयोगाकडील सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस तपासणीसाठी आवश्यक असलेली सर्व अभिलेखे त्यांच्यासोबत आणलेली आहेत. परंतु अपिलार्थी आयोगासमोर त्यांच्या आक्षेपांचे स्पष्टीकरण करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

प्रसंगावशात, अपिलार्थीकडून दि. २५.०४.२००८ रोजी प्राप्त झालेल्या अर्जास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.संत ज्ञानेश्वर निवासी मतिमंद विद्यालय,अहमदपूर,जि.लातूर यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती (दि. ०१.०४.१९९४ ते ०१.०४.२००८) पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जरी विलंब लावला असला तरी हा कालावधी त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याइतपत समर्थनीय नाही. तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती हेतुपूर्वक दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चामे अंकुश रामचंद्र, रा.मु.पो. चिखली, ता. अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.संत ज्ञानेश्वर निवासी मतिमंद विद्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१८
निर्णय दिनांक: ०८-१०-२००९

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
रा.टेंभूर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळीच माहिती उपलब्ध करुन दिली नाही. सत्य माहिती दडवून ठेवून कर्तव्यात कसूर केला, त्यामुळे त्यांना एक महिन्यानंतर प्रत्येक दिवशी रु.२५०/- इतका दंड लावण्यात यावा व रु. २०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी व दंडाची रक्कम अर्जदाराच्या खर्चापोटी अर्जदारास देण्याचे आदेश व्हावेत आणि त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित मार्च, २००७ ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०६.२००८ रोजीचया पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि हे आदेश निर्गमित होण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून अपिलार्थीस त्या ही माहिती सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे न केल्यामुळे अंतिमतः अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. अशाप्रकारे आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार

असल्याचे आयोगास आढळून येत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ०८-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, रा. मु. टेंभूर्णी, पो.ता.अहमदपूर, जि.लातूर - ४१३५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१९
निर्णय दिनांक: ०८-१०-२००९

१. श्री. मलंग अब्दुल रहेमान पि.मो. इस्माईल, : अपिलार्थी
रा.उदगीर,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद,उदगीर, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद,उदगीर, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन निरीक्षक,
नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी २७ दिवस विलंबाने अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील घर क्र. ४-२-५१, ४-२-६०,४-२-५९ व १-३-५९ च्या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२,३ व ८ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०६.२००८ रोजी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजी प्रथमतः व तदनंतर दि. ०७.०६.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदारास माहितीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्यासाठी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे त्यांचे उत्तरदायित्त्व वेळेत पार न पाडल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब

लागला. या विलंबास अपिलार्थी हे स्वत:च जबाबदार आहेत, यासाठी जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे दंडनीय कारवाई आयोग आदेशित करीत नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती पाहता, ही माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे म्हटले आहे. तथापि त्यांच्या या अभिप्रायापृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. एवढेच नव्हेतर हा मुद्दा सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज सुनावणीसाठी उपस्थित देखील नाहीत. हे पाहता, विशेषत: अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०८-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहेमान पि.मो.इस्माईल, रा. दबीरपुरा, घर नं. १-३-५८, उदगीर, ता. उदगीर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,उदगीर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२१

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (बु.),
तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड,
तालुका जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (बु.) यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक ३१-०३-२००८ रोजी अर्ज पाठवून काही माहिती मागितली असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता प्रथम अपिलेट अधिकारी यांनी या प्रकरणी निर्णय न दिल्यामुळे व प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायतीच्या कार्यालयातून सन २००५ ते दि. ३१ मार्च २००८ या कालावधीमध्ये पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या किती मुस्लीम मुली व मुलांना जन्मदिनांक प्रमाणपत्र देण्यात आले त्या सर्व मुस्लीम मुली व मुलांच्या जन्मदिनांक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती आणि त्यांच्या पालकांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे याकरिता सादर केलेली आवश्यक ती कागदपत्रे - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर असून त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांचा दिनांक ३१-०३-२००८ रोजीचा मूळ अर्ज ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (बु.) यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पोहोचला. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाच्या पोच पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही जन माहिती

अधिकारी यांनी ती अपिलार्थीस पुरविली नाही. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावरही त्यांना कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. सबब अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (बु.), तालुका जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा (बु.), तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२२

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल,
जगजीवनराम मार्ग, देगलूर नाका रोड, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल उलुम
मार्फत, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, जगजीवनराम
मार्ग, देगलूर नाका रोड, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, नांदेड यांच्याकडे दिनांक २४-१०-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अर्ज पाठवूनही मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल उलुम, नांदेड यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असता प्रथम अपिलेट अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००८ रोजी

एका आठवड्याच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही, त्यांनी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या भरतीसंदर्भात व कायमस्वरुपी नियुक्तीच्या संदर्भात दिनांक ०१-०४-२००० ते २५-१०-२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवांकडे दिनांक २२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. संबंधित संस्थेच्या सचिवांनी यासंदर्भात निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांच्याकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याच्या संदर्भातील पुरावा उपलब्ध नाही. तसेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २०-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याचे म्हटले आहे. त्या निर्णयाची प्रतही आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही, तसेच आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत देखील त्यांनी या निर्णयाची प्रत जोडलेली नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी दिनांक ०४-१२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अपील दाखल केल्याचे नमूद केले आहे.तथापि शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/ १५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे शिक्षण संस्थांच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिका-यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याचा पुरावा नाही, तसेच

प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्यामुळे आणि आवश्यक ती कागदपत्रे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडली नसल्यामुळे अथवा सुनावणीचे वेळी आयोगास दाखवू शकत नसल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, जगजीवनराम मार्ग, देगलूर नाका रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल उलुम मार्फत, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, जगजीवनराम मार्ग, देगलूर नाका रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२३

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देगलूर,
तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर,
तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांच्याकडे माहिती मागितली असता विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे पत्र क्रमांक १५५८, दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या लेखी आदेशाप्रमणे सम्राट अशोक प्राथमिक शाळा, देगलूर ही गैरकायदेशीररित्या चालू असल्याबाबत संबंधित संस्थाचालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी शाळेवर किंवा शाळेच्या संस्था चालकावर कोणत्या प्रकारची कायदेशीर कार्यवाही केली यासंदर्भात माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही आणि यासंदर्भात दिनांक २४-०३-२००८ रोजी केलेल्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांच्याकडील प्रथम अपिलावर देखील कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील केल्याच्या संदर्भात आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे सिध्द होत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२४

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, भोकर, तालुका भोकर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत दिनांक १८-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक १२-०३-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीकडे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत उपलब्ध नाही. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १५-०५-२००८रोजीच्या कथित आदेशाची प्रत जोडलेली नाही. संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सुनावणीसाठी आज रोजी गैरहजर आहेत. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे माहिती अधिकारी यांना सूचित करण्याचे कथित आदेश मूळात अस्तित्वात आहेत किंवा कसे याची खात्री करण्याच्या दृष्टीने अपिलार्थीस असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत जोडून राज्य माहिती आयोगाकडे नव्याने व्दितीय अपील सादर करावे म्हणजे त्यांच्या विचाराधीन अपिलावर निर्णय घेणे आयोगास सुकर होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२५

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मुतवल्ली महंमद उस्मान हुसेनी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली असता त्यांना मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नांदेड येथील मंडीहलाव तकीया मक्का मस्जिदजवळ, चौक बाजार नांदेड या इनामी जागेच्या संदर्भात नियुक्त केलेल्या मुतवल्ली महंमद उस्मान हुसेनी यांच्या संदर्भात सन २००५ ते दि. ३१-०१-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही परंतु यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती पुरवावी असे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने त्यांना मूळ अर्जातील माहिती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठी-चा अर्ज केला होता त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत असलेले अधिकारी आता नियतवयोमानानुसार दिनांक ३१-०७-२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तथापि आता ते अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात काही माहिती मागितली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी कोणतीही हरकत

नसावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरविण्यात यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी जबाबदार असलेले संबंधित जन माहिती अधिकारी हे आता सेवेतून नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२६

निर्णय दिनांक ०९-१०-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागण्यासाठी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या कार्यालयात दिनांक १७-१२-२००७ रोजी अर्ज दाखल केला असता त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या

प्रकरणी सुनावणी न घेता त्यांचे अपील प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही कागदपत्रांची मागणी न करता नांदेड शहरामध्ये ओव्हर ब्रीजसाठी करण्यात आलेल्या भरावाच्या सामुग्रीमध्ये किती प्रमाणात काळी माती आहे हे तपासण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व गुणनियंत्रण मंडळाचे अधिकारी यांच्या समक्ष या भरावाचे खोदकाम करुन पंचनामा करण्याबाबत विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १५२७/०८ व १५२८/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२७ व १५२८
निर्णय दिनांक : ०९-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मुदखेड महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नांदेड | | |

अपील क्र.१५२७/०८ :
त्रयस्थ पक्ष : सचिव, सना उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा (बु.), नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.९.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र. १५२७/०८ व १५२८/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.१२.२००७ रोजी अर्ज दाखल केले असता, जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १३.१२.२००७ रोजीच्या त्यांच्या दोन स्वतंत्र अर्जाद्वारे उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे सना ऊर्दू प्राथमिक शाळेच्या संदर्भात वेगवेगळी माहिती मागितली असता, त्यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे व अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि.२१.०१.२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि संबंधित त्रयस्थ पक्ष हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२१.०१.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते.

सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयांनी अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त दोनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१५२७/०८, व १५२८/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या उपरोक्त दोन प्रकरणातील दि.२१.०१.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश नि- ार्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०९-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेड महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,रा. मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२९
निर्णय दिनांक: ०९-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नांदेड

त्रयस्थ पक्ष: १)श्री नरसिंग पल्लेवाड
२)श्री. कंठीराम गंगाराम राठोड
३) श्री.सगर सुरेश बाबुराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. २१.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल करुनही त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - सहशिक्षक, श्री. नरसिंग पल्लेवाड, कंठीराम गंगाराम राठोड व सगर सुरेश बाबुराव यांनी खोट्या जातीच्या प्रमाणपत्राआधारे नोकरी मिळविल्याबद्दल अपिलार्थीच्या क्र. १०७/२००७-०८, दि. ०५.१२.२००७ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली व जर कार्यवाही केली नसेल तर त्यांची कारणे - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली असा युक्तिवाद केला. तथापि याबाबत आयोगास कोणताही सबळ पुरावा त्यांना सादर करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात त्यांनी दि. ०५.१२.२००७ रोजी उपशिक्षणाधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जावर त्यांच्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली, एवढीच माहिती त्यांना देय होत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील संबंधितांच्यावर कार्यवाही न केल्यास त्याचे कारण, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे.

माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा त्यांचे खुलासे, स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. सबब या प्रकरणी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांनी, अपिलार्थीच्या दि. ०५.१२.२००७ रोजीच्या तक्रार अर्जावर त्यांनी कोणती कार्यवाही केली, एवढीच माहिती अपिलार्थीस देय होत असल्यामुळे, अपिलार्थीचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर या तक्रारीसंदर्भात त्यांनी वेगवेगळया प्राधिकरणाशी, व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व तसेच या तक्रार अर्जाच्या अभिलेख्यावर करण्यात आलेल्या टिपणीच्या प्रती, अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचा कालावधी विहित करण्यात येत आहे.तसेच त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, सचिव (शालेय शिक्षण) यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात जन माहिती अ[illegible]ी कार्यवाही ही माहिती, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस, हे

कृ.मा.प...४

आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०९-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३०
निर्णय दिनांकः ०९-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद पिता महंमद युसूफ,रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १२.०२.२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली असता मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नांदेड यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. १६.०७.२००५ रोजीच्या सेवादास शिक्षण संस्था, सेवादासनगर, नांदेड यांच्याविरुध्द

वेगवेगळया मुद्यांवर केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या अर्जामध्ये कोणत्या शाळेबाबत त्यांना माहिती हवी आहे, याचा उल्लेख नसल्याने त्या शाळेस पत्र पाठविण्यास अडचण येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व शाळेच्या नावाचा उल्लेख करण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले किंवा कसे हे आवश्यक त्या पुराव्या अभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने दि. ०८.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर चार वेळा सुनावणी ठेवण्यात आली होती. या सुनावणीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.०५, १६.०५, ०३.०६ व २७.०६.२००८ रोजी अपिलार्थीस पाठविले होते. तथापि या सुनावणीसाठी  अपिलार्थी हे उपस्थित न राहिल्याने, त्यांनी दि. २४.०७.२००८ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील अंतिमत: निकाली काढले असल्याचे कळविले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दि. २२.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, दि. १२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास दि. १५.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संदर्भित शाळेचे नाव कळविण्याबाबत सूचित केले. तथापि अपिलार्थीकडून त्यांना कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर चार वेळा सुनावणी ठेऊनही ते सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय देता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे

आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांच्या तक्रार अर्जाचा दिनांक व ही तक्रार ज्या संस्थेविरुध्द केला आहे की, सेवादास शिक्षण संस्था, सेवादासनगर यांचाही उल्लेख केला आहे. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संस्थेच्याविरुध्द त्यांनी केलेल्या तक्रारअर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी ३ दिवस विलंबाने प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा माहितीसाठीच्या अर्जामध्ये शाळेचा उल्लेख केला नाही, असे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. अपिलार्थीने सेवादास शिक्षण संस्थेच्याविरुध्द तक्रार केली असताना अपिलार्थीस शाळेचे नाव विचारण्याचे कोणतेही प्रयोजन जन माहिती अधिकारी यांना नव्हते. केवळ अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणे हाच जन माहिती अधिकारी यांचा उद्देश असल्याचे त्यांच्या दि.१५.०३.२००८ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रावरुन स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस त्यांच्या कार्यालयातील दि. १२.०२.२००८ रोजी नेमणूक केलेल्या/कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांचे नाव माहिती नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ती दिवसांच्या विलंबाने प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा तीन

दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद देऊन व अपिलार्थीस आवश्यक माहिती देण्याचे टाळल्यामुळे त्यांना विलंबाच्या त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे तीन दिवसांच्या विलंबासाठी एकूण रु.७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचे निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेमधील दि. १२.०२.२००८ व तदनंतर ३० दिवसांपर्यंत कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांचा शोध घेऊन आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होतील, असे पहावे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, येथून पुढे त्यांनी आयोगाकडे सुनावणीसाठी त्यांच्या प्रतिनिधीस पाठविताना त्या प्रतिनिधीस संबंधित प्रकरणाची संपूर्ण माहिती असेल, असात प्रतिनिधी पाठविण्याची दखता घ्यावी, अन्यथा आयोगातर्फे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.नांदेड यांना सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी समन्स अथवा वॉरंट पाठवावे, लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा तीन दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल व माहिती देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल त्यांना एकूण रु.७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद पिता महंमद युसूफ,रा. मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७ रामाआ/अपील/सिआर/२८०४
निर्णय दिनांकः ०९-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय, लोहा, जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, लोहा, जि. नांदेड
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी, कापसी, ता. लोहा, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,लोहा यांच्याकडे दि. ३०.०४.२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज पोस्टाने पाठविला असता, मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०६.२००७ रोजी पोस्ट रजिस्ट्री क्र. ५४९३ अन्वये प्रथम अपील दाखल करुनही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.३०.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे आर्थिक वर्ष २००४-०५ व २००५-०६ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या रोजगार हमी योजनेसंदर्भातील कामांची विस्तृत प्रमाणात माहिती

मागविली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयात मूळात अपिलार्थीचा दि. ३०.०४.२००७ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच अपिलार्थीचा दि. १२.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्ज देखील त्यांच्या कार्यालयात प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवू शकले नाहीत व पर्यायाने अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी तसे शपथपत्र आयोगाकडे सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितील अपील अर्जासोबत त्यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या अर्जासंदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी हा पुरावा व्यक्तिशः सादर करण्यासाठी देखिल अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांच्या कार्यालयाची आवक रजिस्टरची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. त्यामध्ये अपिलार्थीच्या अर्जांचा समावेश असल्याचे आढळून आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता व तसेच अपिलार्थीने संबंधितांच्याकडे केलेल्या

पत्रव्यवहाराचा आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केला नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ०९-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, कापसी, ता. लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२८०५
निर्णय दिनांक: ०९-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी,
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विभागीय समाजकल्याण अधिकारी
लातूर

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०७.०७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहितीची मागणी केली असता त्यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता मनमानी शुल्क आकारुन अपिलार्थीची दिशाभूल केल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयाकडे त्यांच्या कार्यालयामार्फत आर्थिक वर्ष २००५-०६ व २००६-०७ मध्ये किती अपंग लाभार्थ्यांना कर्ज वाटप केले यासंदर्भात व तसेच त्यांच्या कार्यालयांतर्गत अनुदान देण्यात येणाऱ्या आश्रम शाळा व वसतीगृहाच्या संदर्भात सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित शाळेच्या नावाची यादी, अनुदान, अनुदानाचे स्वरुप अशाप्रकारची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने दि. १३.०८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून श्री. अविनाश देवसटवार (सध्या सहयोगी प्राध्यापक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण केंद्र, राणीचा बाग, पुणे येथे कार्यरत) हे अधिकारी कार्यरत होते. त्यांनी दि. २१.०८.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तयार करुन ठेवली होती त्या माहितीच्या पत्रावर जा.क्र.३८०४ दि. ०४.०८.२००७ असा उल्लेख आहे. तथापि त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची पहाणी केली असता, हा जावक क्रमांक दुसऱ्या पत्रास देण्यात आल्याचे दिसून येते व अपिलार्थीच्या पत्रावर खाडाखोड केल्याचे आढळून येते, त्यावरुन त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चितपणे प्रतिसाद दिला किंवा कसे, हे सांगता येत नाही. तथापि आता आयोगाची नोटीस आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. ०७.१०.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे

त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाठवून दिली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने अपंग लाभार्थ्यांना दिलेल्या कर्ज वाटपाबाबत जी माहिती मागितली आहे, ती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसून ती समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे दोन वेगवेगळया प्राधिकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसेल तर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित प्राधिकरणाकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे जरुरीचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती केलेली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०७.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या अपंग लाभार्थ्यांच्या संदर्भातील माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे वेळेत कार्यवाही न करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे येथे दिसून येत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील अपंग लाभार्थ्यांच्या संदर्भातील अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले आहे. सबब समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांनी मागणी केलेली अपिलार्थीच्या

अर्जाशी संबंधित माहिती त्यांना प्राधान्याने पुरवावी. याकरिता त्यांनी कोणताही विलंब लावू नये अन्यथा अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लागलेल्या विलंबाबाबत त्यांना जबाबदार ठरविले जाईल. उपरोक्त प्रकरणी तत्कालीन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री. अविनाश देवसटवार (सध्या सहयोगी प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण केंद्र,समाजकल्याण विभाग, राणीचा बाग, पुणे येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, समाजकल्याण यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस [illegible] कृ.मा.प.५...

३. संचालक (समाजकल्याण) यांना संबंधित जन [illegible] अविनाश देवसटवार (सध्या सहयोगी प्राध्यापक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण केंद्र, राणीचा बाग,समाजकल्याण विभाग, पुणे येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०९-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद पिता महंमद युसूफ,रा. मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक (समाजकल्याण),३, चर्च रोड, स्टेशनरोड, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६५

निर्णय दिनांक १६-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी

रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,

तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,

तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. महारुद्रप्पा कोडींबा चवळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस न बोलाविल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नगरपरिषद मुरुम यांनी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचा मार्च २००६ ते २००८ पर्यंत किती प्रवास खर्च आला व त्रयस्थ पक्ष री. महारुद्रप्पा चवळे यांनी नळ बील व घरभाडे दाखल केल्याची माहिती अशा स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००६-२००८ असा आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून व्यक्तिशः व टपालाव्दारे अशा दोन माध्यमाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त

झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६६

निर्णय दिनांक १६-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व आयोगास असे अवगत केले आहे की, नगर परिषद मुरुम यांनी मालमत्ता कर फेर आकारणी करतांना त्यातील बरीच नवीन बांधकामे वगळली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, मुरुमच्या क्षेत्रामध्ये मालमत्ता कर आकारणी संदर्भात व विशेषत: पाणीपट्टी वाढीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून  माहिती मागितली आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली.  ही माहिती अपिलार्थीने प्रत्यक्षत: दिनांक २९-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली.  तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली त्याचा तपशील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.  मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. नागसेन हनमंत बनसोडे हे आयोगासमोर उपस्थित आहेत.  त्यांनी आयोगासमोर असे स्पष्ट केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २९-०४-२००८ रोजी प्रत्यक्षत: माहिती प्राप्त झाली आहे.  प्राप्त माहितीवर त्यांचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेली आहे.  मुरुम नगरपरिषदेने केलेल्या मालमत्ता कर फेर आकारणीवर अपिलार्थीस आक्षेप असल्याचे सर्वसाधारणपणे दिसून येत आहे.  अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, नगर परिषदेने फेर

कर आकारणी करतांना काही नवीन बांधकामे यातून वगळली आहेत. या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या मुद्दयावरील तक्रारीकरिता त्यांनी संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई अथवा सचिव (नगर विकास) यांच्याकडे तक्रार करावी. अपिलार्थीच्या अर्जामध्ये कथित नवीन बांधकामासंदर्भात कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच अर्जामध्ये माहितीच्या कालावधीचा उल्लेख नाही व प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही अभिप्राय नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६७

निर्णय दिनांक १६-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नगर परिषदेच्या क्षेत्रातील ओपन स्पेस विहिरीचा भूखंड २६३५/३/१ विकल्याच्या संदर्भात स्थायी समितीने घेतलेल्या ठरावाच्या प्रती व मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम यांच्याऐवजी लेखाधिकारी यांना कोणत्या नियमान्वये माहिती अधिकारी पद दिले याबद्दलची माहिती, अशा तीन मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००१ ते २००८ असा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व टपालाव्दारे अपेक्षिली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ वगळता उर्वरित माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपुरी असल्याकारणाने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. नागसेन बनसोडे यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी एकूण तीन मुद्दयावर माहिती मागविली असतांना त्यांना फक्त एकाच मुद्दयावरील माहिती मिळाली असल्याने उर्वरित दोन मुद्दयावरील माहिती आवश्यक असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या

दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे विचारलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "भूखंड २६३५/३/१ विकल्याबाबत माहिती " अशा प्रकारची माहिती मागितली आहे. या मुद्दयाद्वारे अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे हे समजून येत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्या ऐवजी लेखापालास जन माहिती अधिकारी म्हणून कोणत्या नियमाद्वारे नेमले आहे अशी माहिती मागितली होती. या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २९-०४-२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरवली आहे. ती अपिलार्थीच्या मागणीशी सुसंगत आहे. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने मुरुम नगरपरिषदेच्या सन २००१ ते २००८ पर्यंतच्या कालावधीत स्थायी समिती व जनरल कमिटीने घेतलेल्या ठरावाच्या प्रती मागितल्या आहेत. ही माहिती अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देय असलेल्या दोन मुद्दयावरील माहितीपैकी प्रथमतः फक्त एकाच मुद्दयावरील माहिती दिली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचा अपिलार्थीचा मुद्दा सिध्द होत आहे. अपिलार्थीस अशा प्रकारे अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमतील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक (प्र.लेखापाल) नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६८

निर्णय दिनांक १६-१०-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख,<br>रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीसाठी बोलाविले नाही. सिमेंट रोड मुदकण्णा गल्लीमध्ये स्टील कमी वापरले व सदरील काम मार्चअखेर केल्यामुळे व वाढीव अनुदान लाटण्याचाच प्रकार केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मुदकण्णा गल्ली ते आंबेडकर चौक सिमेंट रोडचे काम निकृष्ट दर्जाचे

असल्याबाबतची माहिती आणि सिमेंट कॉंक्रिट रोडचे इस्टीमेटप्रमाणे कामाचा दर्जा कसा आहे, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००७-२००८ असा आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली व अपिलार्थीने संदर्भित केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २९-०४-२००८ रोजी व्यक्तिशः प्राप्त झाली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीने यानंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. नागसेन बनसोडे यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. आता त्यांची कोणतीही तक्रार उरलेली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या प्रथम अर्जातील, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात सिमेंट रोडच्या अंदाजपत्रकाची प्रत एवढीच माहिती देय होत आहे. उर्वरित मुद्दयावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे ती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अंदाजपत्रकाची प्रत

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य प्राप्त झाली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज व आयोगाकडे केलेले व्दितीय अपील यावरुन अपिलार्थीचा सिमेंट रोडच्या कामामध्ये कमी स्टील वापरले व त्याद्वारे अनुदान लाटण्याचा प्रयत्न केला असा आक्षेप आहे असे दिसून येते. त्या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या कामासंदर्भात जर त्यांच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी याबाबत संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी संपर्क साधावा व आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५६९

निर्णय दिनांक १६-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर माहिती मिळाली. परंतु प्राप्त माहिती अपुरी, खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००८ या कालावधीशी संबंधित असलेली नगरपरिषद क्षेत्रातील यशवंत नगर येथील सिमेंट रस्त्याच्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. यशवंत नगर मुरुम येथील सिमेंट रोड व नाली बांधकाम निकृष्ट असले बाबत माहीती मिळणे बाबत.

२. रोडची लांबी X रुंदी बाबत वर्क ऑटची माहीती मिळणेबाबत.

३. नालीच्या कामाची वर्कऑट माहीती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस या अर्जाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे ज्यावेळी केले त्यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्यामुळे उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक ०५-०५-२००८ रोजी नगर परिषदेच्या मुख्याधिका-याकडे निर्णय घेण्यासाठी पाठविला परंतु त्यांनी यासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. नागसेन बनसोडे यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही कशा प्रकारे चुकीची, दिशाभूल करणारी आहे हे आता सिध्द करता येणार नाही. त्यांच्या मते त्यांनी मूळ अर्जाव्दारे या रस्त्याच्या कामाविषयी माहिती मागितली होती परंतु रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे व यासंदर्भात वरिष्ठ पातळीवरुन चौकशी होणे त्यांना आवश्यक वाटत आहे. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने

माहिती प्राप्त झाली आहे. विलंबाने म्हणजे दिनांक २९-०४-२००८ रोजी माहिती प्राप्त झालेली आहे. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे पाठविले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही विशिष्ट स्वरुपाची नसून ती मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमके कोणत्या मुद्दयावर माहिती अपेक्षित आहे याचा बोध अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये " वर्क ऑट " या विषयी माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रतिनिधीस या शब्दाचा अर्थ आयोगाने सुनावणीच्या वेळी विचारला असता, त्यांना या शब्दाचा अर्थ माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. यावरुन असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे हे त्यांना माहित नाही व या विषयावर त्यांचे प्रतिनिधी कोणतेही स्पष्टीकरण आयोगासमोर करु शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७०

निर्णय दिनांक १६-१०-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी
रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये फक्त २५ बांधकाम परवाने कसे दिले ? त्यांना प्राप्त झालेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मुरुम नगरपरिषदेतर्फे सन २००५-२००७ या कालावधीमध्ये एकूण किती बांधकाम परवाने दिले गेले व प्रत्येक परवान्याचा फी चा पावती क्रमांक ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हे अपील उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना उद्देशून केले होते. परंतु या दिनांकास मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे दिनांक ०८-०४-२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मुरुम नगरपरिषदेकडे पाठविले. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. नागसेन बनसोडे यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली आहे असे आयोगास अवगत केले. परंतु नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली व प्राप्त माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे यासंदर्भात त्यांच्याकडे कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी

त्यांच्याकडे प्रथम अपील केले त्यापूर्वीच दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या संचालक नगर परिषद प्रशासनाच्या आदेशान्वये नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज वेळेत त्यांच्याकडे दिनांक २०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भातील पुढील घडामोडी त्यांना ज्ञात नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे. परंतु प्राप्त माहितीवर अपिलार्थीचा विश्वास नाही. कारण दोन वर्षात फक्त २५ परवानेच कसे दिले गेले याबाबत त्यांना आश्चर्य वाटत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रतिनिधीस, सन २००५ते २००७ या कालावधीत नगरपरिषदेने जे बांधकाम परवाने दिले होते व त्याचा उल्लेख अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये नाही, असा एखादा बांधकाम परवानगीचा पुरावा आपल्याकडे उपलब्ध आहे काय असे आयोगाने विचारले असता, अशा प्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. यावरुन असे दिसून येते की, केवळ जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन कोणत्याही पुराव्याशिवाय अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य उपलब्ध करुन देऊन आपले कर्तव्य पार पाडले आहे. सबब अपिलार्थीच्या आयोगाकडील विचाराधीन अपिलावर आवश्यक त्या पुराव्याअभावी नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७१
निर्णय दिनांक: १६-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, उमरी, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,उमरी, जि. नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.०३.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०६.२००८ सुनावणी ठेवली होती. परंतु या सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी गैरहजर राहिले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्ष २००३ ते दि. ३१.०१.२००८ या कालावधीतील रो.ह.यो., अतिवृष्टी, सानुग्रह अनुदान वाटप इ. संदर्भात विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५,८२२/- इतके शासकीय कोषागारात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता,या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. ११.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मागविला. परंतु अशाप्रकारचा कोणताही तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिला नाही व परिणामी ते आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस एका महिन्याच्या आत आता उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १०.०३.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५८२२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु या पत्रामध्ये त्यांनी या शुल्काचा तपशील, जो त्यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देणे अनिवार्य होते, तो

अपिलार्थीस दिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. ०७.०४.२००८ रोजीचे मूळ पत्रच अवैध ठरत आहे. अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ११.४.२००८ रोजीच्या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. थोडक्यात अपिलार्थीने प्रयत्न करुनही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणे भाग आहे, तो जन माहिती अधिकारी यांनी पुरविला नाही. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या कृतीव्दारे अधिनियमातील कलम ७ (३)(क) च्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे आता त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य माहिती द्यावी लागेल. आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच कृ.मा.प.४... केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आ[illegible] दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,रा. मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, उमरी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७२
निर्णय दिनांकः १६-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, नांदेड, जि.नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.०१.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांनी विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२३.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षकांच्या कार्यशाळेच्या/प्रशिक्षणाच्या संदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शैक्षणिक

वर्ष २००५ ते २००७-०८ या कालावधीशी संबंधित होती व ती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १,९९०/- इतके बँकेत जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ४ वर्षाशी संबंधित माहिती मागितली होती व त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाही. आयोगाने आदेशित केल्यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना आता १५ दिवसांचा कालावधी पुरेसा होईल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २३.०१.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्याकडील दि.२०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद पुरेसा नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा संपूर्ण तपशील उदाहरणार्थ,संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर इ. त्यांना

देणे अनिवार्य होते, तथापि या प्रकरणी त्यांनी अशाप्रकारचा तपशील अपिलार्थीस न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. २०.०२.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७३
निर्णय दिनांक: १६-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी, तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०४.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे वसमत येथील अलहुदा एज्युकेशन सोसायटी संचलीत पूर्व प्राथमिक शाळा, गुलशने मरयम ही शाळा अनधिकृत

असल्याबाबत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत यांनी दि. २९.०२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना पाठविलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची सत्यप्रत आणि जर कार्यवाही केली नसेल तर, का केली नाही, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२००८, २८.०७.२००८ व दि. २५.०८.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिल्याने, अपिलार्थीस माहिती आवश्यक नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील दि.२५.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकाऱ्याने आदेश पारित करुन निकाली काढले. मात्र अपिलार्थीने या पूर्वीच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना त्यांच्या दि.३०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "गटशिक्षणाधिकारी, वसमत यांच्या दि. २९.०२.२००८ च्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही का केली नाही, याची कारणे" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे

अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांचे दि. ३०.०४.२००८ रोजीचे पत्र हे त्यांना सचिव, अलहुदा एज्युकेशन सोसायटी, वसमत, जि. हिंगोली यांना उद्देशून दिलेले आहे व त्याची प्रत गट शिक्षणाधिकारी व अपिलार्थी यांना अग्रेषित केली आहे. जन माहिती अधिकारी यांची, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जास प्रतिसाद देण्याची अशाप्रकारची कृती सर्वथा चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जासंदर्भातील प्रतिसाद त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशूनच देणे त्यांना अनिवार्य आहे.या प्रकरणी अपिलार्थीने संदर्भीय अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही माहिती मागितली आहे. या संदर्भात शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे गटशिक्षणाधिकाऱ्याने दि. २९.०२.२००८ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात शिक्षणाधिकारी कार्यालयाने या विषयावर वेगवेगळ्या संबंधित प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या संदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती अपिलार्थीस देणे या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांचेकडून अभिप्रेत आहे. ही माहिती, आता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार त्यांना विनामूल्य देणे भाग आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-१०-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ,रा. मुख्य संपादक सा.सत्यवृत्त मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७४
निर्णय दिनांक: १६-१०-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.०७.१९९७ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"सना उर्दु हायस्कुल, नामेनियानगर, तरोडा बु, नांदेड या शाळेत सह शिक्षकांना कायम नियुक्त्या देण्यासाठी अधिकृत वैद्यकिय अधिकारी किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन

वैद्यकिय पात्रता (मेडिकल फिजिकल फिटनेस) प्रमाणपत्र न घेता खाजगीरित्या मेडिकल फिजिकल फिटनेस प्रमाणपत्र घेवून त्यांना कायमस्वरुपी नियुक्त्या येते काय? सना हायस्कुल नांदेड या शाळेत सह शिक्षक आसीया तहफीम सह शिक्षिक महंमद सैफोदीन मुख्याध्यापीका मेराजुन्नीसा बेगम यांनी खाजगी डॉक्टराकडून मेडिकल फिजिकल फिटनेस सर्टीफीकेट घेतलेला आहे. ते प्रमाणपत्र शासनाच्या नियमाप्रमाणे ते प्रमाणपत्र शिक्षण विभागाने मान्य केले काय? जर मान्य केले असेल तर शासकिय नियमाप्रमाणे शासकिय नियमावलीसहीत लेखी स्वरुपात वरील प्रमाणे माहिती मिळणे बाबत."

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही, मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना त्यांच्या दि.३०.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितलेली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी फक्त त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपातच देण्याच्या संदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदारास

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व मते अपेक्षित करणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, "ज्या शासकीय अधिनियमाप्रमाणे खाजगी डॉक्टराकडून मेडिकल फिजिकल फिटनेस सर्टीफिकेट शिक्षण विभागाने मान्य केले त्या आदेशाची प्रत" एवढीच माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्याकडील अशाप्रकारच्या अधिनियमाची माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली माहिती (अधिनियमाची प्रत), हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७५
निर्णय दिनांकः १६-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
सचिव,
मोमीन एज्युकेशन सोसायटी, नांदेड, जि. नांदेड. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड.

**विरुध्द**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे दि. १५.०५.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांनी विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या दोनही अर्जाचे व अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.०५.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अर्ज पाठवून दिल्याचे नमूद केले आहे. मात्र आयोगाकडे सादर केलेल्या प्रथम अर्जाच्या प्रतीचे अवलोकन केले असता, त्यांना हा अर्ज दि. १४.०२.२००८ रोजीच टंकलिखित केल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने मूळ अर्ज टंकलिखित करुन माहितीसाठीचा अर्ज संबंधितांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर (दि. ०८.०४.२००८ नंतर) पाठवून देऊन आपल्या कृतीतील विसंगती स्पष्ट केली आहे. तसेच अपिलार्थीने ज्या प्रकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील केले आहे. ते जन अपिलीय प्राधिकरण हे या संस्थेचे जन अपिलीय प्राधिकरण नाही. अपिलार्थीस जर त्यांना आवश्यक असलेली माहिती धर्मादाय आयुक्त यांच्यामार्फत प्राप्त करुन घ्यावयाची असेल तर त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे त्यांना भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती त्यांनी केलेली नाही. जन माहिती अधिकारी व कथित जन अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत, जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा एकमेकांशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे अपिलार्थीची वेगळया प्राधिकरणाकडे प्रथम अपील करण्याची कृती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक :    १६-१०-२००९**                    **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.  श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२.  जन माहिती अधिकारी तथा सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.  जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०८
निर्णय दिनांकः १६-१०-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ब्रिगेडियर अब्दुल हमीद ऊर्दू पूर्व प्राथमिक शाळा, नांदेड, जि. नांदेड. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००८ रोजी फेरसादर झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०५.१२.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा, सचिव, अंजुमन फलाह बाहेबुदी देहाती अखलियती खवातीन एज्युकेशन सोसायटी हैदरबाग, नांदेड यांच्याकडे दि. २४.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.१२.२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे दि. २४.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस तत्कालीन संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा संस्थेचे सचिव यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले. शिक्षणाधिकाऱ्यांच्या या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने दि. २०.०३.२००७ रोजी संबंधित सचिवांकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.१६.१०.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६२५२७/१५ क्र.(८) ६०३७, दि.२६.११.२००७ अन्वये शिक्षण संस्थांच्या संदर्भात प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकाऱ्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०१.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२४.०१.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-१०-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ब्रिगेडियर अब्दुल हमीद ऊर्दू पूर्व प्राथमिक शाळा, नांदेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), हिमायतनगर, जि. नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २४३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), हिमायतनगर,
जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, हिमायतनगर, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २४७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६/१०/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,
देगलूर, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

**<u>निर्णय</u>**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,
देगलूर, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,
देगलूर, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २८.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>मदिनातुल उलुम मुलांचे उर्दू प्राथमिक शाळा,<br>लालवाडा, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २९.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
बैतुलउलुम उर्दू प्राथमिक शाळा, नवी आबादी,
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ३०.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०
निर्णय दिनांक १६/१०/२००९

१ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
मदिनातुल उलुम मुलांचे उर्दू प्राथमिक शाळा,
लालवाडा, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक २९.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>फैजुल उलुम उर्दू हायस्कूल, गोकुळनगर, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २७.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १९.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२
निर्णय दिनांक १६/१०/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>फैजुल उलुम उर्दू प्राथमिक शाळा, फारुखनगर,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १९.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६/१०/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा. रामरहीमनगर, घर नंबर ९-४-१०६१, पोस्ट ईतवारा, नांदेड.